डेकॅथलॉन

सररिअल (प्लस)

श्रीधर तिळवे-नाईक

नवता

नवता प्रकाशन क्रमांक ??

डेकॅथलॉन सररिअल (प्लस)

© श्रीधर तिळवे

shridhar.tilve1@gmail.com
संपर्क : ९८९२२२९७३०

पहिली आवृत्ती : **१५ ऑगस्ट २०११**

प्रकाशन :
'नवता'
कीर्तिकुमार शिंदे
६०२, आदित्य अपार्टमेंट,
आशानगर, कांदिवली (पूर्व),
मुंबई- ४००१०१
संपर्क : ९६१९९२२१२६
ई-मेल : navataa.prakashan@gmail.com

मुखपृष्ठ :
????

अक्षर जुळणी-मांडणी :
नवता अक्षरजुळणी

मुद्रण :
इंडिया प्रिंटिंग वर्क्स
इंडिया प्रिंटिंग हाऊस,
४२, जी. डी. आंबेकर मार्ग,
वडाळा, मुंबई- ४०००३१

मूल्य १०० रुपये

प्रिय
सुमंगला तिळवे
व
उज्वला तिळवे
ह्या माझ्या दोन बहिणींना

बहीणभाऊ एकमेकांच्या जीवावर उठलेल्या
काळात तुम्ही मला कसलीही अट
न घालता केवळ प्रेम आणि प्रेमच दिलंत. तुमच्या
भाबडेपणाचा प्रचंड फायदा उठवून ह्या जगाने तुमच्यावर अनन्वित
अत्याचार केले तेव्हाही स्वत:ची प्रखर नैतिकता तुम्ही कधी सोडली नाही,
आणि मीही ती सोडू नये म्हणून अनेकदा आवश्यक असूनही मन मारून अनेक
गोष्टी तुम्ही मागितल्या नाहीत. तुमच्या ह्या रागीट भावाचा राग तुम्ही केवळ
सहन नाही केलात, तर त्यालाही सहर्ष स्वीकारलेत. माझ्या सगळ्या
गुणदोषांची झळ आई-भाऊंच्या नंतर तुम्हालाच जास्त बसली.
तुमच्या त्या सांभाळून घेण्याला
माझा हॅटस् ऑफ.
माझ्या प्रेमळ बहिणींनो,
माझ्या बेबंद आणि अव्यवहारी
लाईफस्टाईलला माफ करा आणि
ह्या कविता स्वीकारा.

श्रीधर तिळवे-नाईक

मनोगत

१९८२ ते १९८७ हा माझा आयुष्यातला कवी म्हणून जडणघडणींच्या कालखंड! पहिल्या तीन नवता पचवत, चौथ्या नवतेकडे नेणारा! ह्या कालखंडातील सगळ्या कविता गोळा करून त्यांचे वर्गीकरण करताना त्यांचे आठ गट होतील असे दिसते.

यापैकी पहिला गट 'डेकॅथलॉन : इन्ट्रो' जो डेकॅथलॉन या नावाने आला. दुसरा 'डेकॅथलॉन : इनिशिअल' ज्याच्यातील काही कविता ऑलरेडी 'एका भारतीय विद्यार्थ्याचे उद्‌गार' या नावाने प्रकाशित झाल्यात. तिसरा 'डेकॅथलॉन : रिअल (मायनस)', पाचवा 'डेकॅथलॉन : ट्रान्सरिअल (इन्फिनीट)', सहावा 'डेकॅथलॉन : नॉनकॅटॅगरीकल', सातवा 'डेकॅथलॉन : एलसेट्रा'. याशिवाय आठवा 'डेकॅथलॉन : लोकल' हा या कालखंडातला गट माझ्या 'आत्मचरित्रातले काल्पनिक क्षण : टची, टचेबल ॲन्ड अनटचेबल' या महाकृतीचा प्रथम खंड म्हणून आधीच प्रकाशित झालाय.

'डेकॅथलॉन : सररिअल (प्लस)' हा या वर्गीकरणातला चौथा गट. या गटात मी त्या कवितांचा समावेश केलाय ज्या कल्पनाजन्य आहेत. इंद्रियजन्य वास्तव हे खरे वास्तव ठरवणे अवघड आहे. आजच्या काळात तर हा वादही निरर्थक झालाय, पण ज्या काळात या कविता लिहिल्या गेल्यात त्या काळात 'वास्तव म्हणजे काय?' 'अतिवास्तव म्हणजे काय?' हे कळीचे प्रश्न होते. या संग्रहात घराविषयीच्या आणि घरातल्या फर्निचरविषयीच्या अनेक कविता आहेत. त्या एवढ्या संख्येने आणि अशाच तऱ्हेने मी का लिहिल्या हे माझ्यासाठीही कोडे आहे. आशा आहे की या कविता चांगला फील देतील.

श्रीधर तिळवे–नाईक

अनुक्रमणिका

१. पोरगी ९
२. शब्द १०
३. गाणे १२
४. संगीत.....१३
५. बंदा १३
६. शुटिंग १३
७. कदाचित.....१४
८. भाषित १४
९. पोंगल.....१५
१०. गोलकीपर १५
११. जे चुमचे आहे.....१६
१२. शंका.....१७
१३. हातरुमाल १७
१४. महादगड १७
१५. हॅट.....१८
१६. मी झाडाला झाड झाड झाडलं तेव्हा.....१८
१७. अटळ १९
१८. ज्योतिषा.....१९
१९. बिनडोक.....२०
२०. दुसऱ्यानं काय गुन्हा केलाय ...२०
२१. काळ-१ .....२१
२२. काळ-२ .....२१
२३. मराठी.....२२
२४. निघून जा २२
२५. शाबूत २३
२६. कटी पतंग २३
२७. मासे, माश्या आणि माणसे...२४
२८. माणसा २४
२९. खिडकी.....२४
३०. ड्रॉवर्स २५
३१. भुकेचा स्टो २५
३२. बाहुली.....२६
३३. वीरमरण.....२६
३४. प्रिये.....२७
३५. पुतळा २७
३६. सरड्याप्रमाणे रंग बदलणाऱ्या ऋतूत २८
३७. झोक.....२९
३८. आंबा २९

३९. अजीबोगरीब सतीगमन ३०
४०. डोकं घडवताना ३०
४१. सावली झाडाची ३१
४२. आहे कुणात दम ३१
४३. मेकअप इफेक्ट.....३२
४४. ढग.....३२
४५. नळ, बटाटा, खुर्ची इ. ३३
४६. आवाज ३४
४७. आठवणी ३४
४८. नवरामाचे स्वगत ३५
४९. कारभार.....३६
५०. वाढ.....३६
५१. विश्वाचं इन्टेरिअर.....३७
५२. नरसंपदा.....३७
५३. क्रिस्टलायझेशन.....३८
५४. एक भिंत.....३८
५५. जड आयुष्य ३९
५६. स्फटीक ३९
५७. बाजू ४०
५८. पोरगी.....४०
५९. तीन शिराची बाई ४१
६०. निम्फो प्राध्यापिकेसमोर ४२
६१. पांढरे ससे ४२
६२. जयश्या.....४३
६३. पेनाबरोबर एक संभाषण ४४
६४. सॅम पित्रोदासाठी एक कविता ४५
६५. तास ४५
६६. एक माणूस ४६
६७. किशोरी आमोणकर आणि
तिची आई ४६
६८. न्यूड क्लबच्या किनाऱ्यावर...४७
६९. बये ४७
७०. ट्रेन ४८
७१. हा महादगडाचा ४८
७२. सिल्की बॉडी ४९
७३. शिल्लक.....४९
७४. एक्जरसाइज ५०
७५. मी माझ्या शब्दांनी देईन.....५०
७६. परीस ५१
७७. आता बघायचं.....५१
७८. मॉस आणि फंगस.....५२
७९. ताप ५२
८०. निकड.....५३
८१. संगीत ५३
८२. दहा बोटे.....५४
८३. कॉम्प्युटर बॉयसाठी
एक कविता ५४
८४. गॅम्बलर ५५
८५. नाश्ता ५५
८६. कर्णा ५६
८७. शाहू स्मारक भवनात एक शू५६
८८. कैद.....५७
८९. आता काय समजावं.....५७
९०. जळणं.....५८
९१. उंचच उंच बिल्डिंग ५९
९२. ती कोण आहे ५९
९३. अस्वस्थ.....६०
९४. निरोप घेताना.....६१
९५. समाधान ६१
९६. कला ६२
९७. कहाणी.....६३
९८. प्रवास पूर्ण होईल तेव्हा ६३
९९. मॅन्शन.....६४
१००.कविता ६५
१०१. डोळा.....६५
१०२. युद्ध.....६६
१०३. कालातित थंडीत तो ६८
१०४. शहर - फर्स्ट व्हिजिट ६९
१०५. शवपेटीतून ७०
१०६. सेकण्ड हॅण्ड मार्केट ७१
१०७. महावाक्य ७२
१०८. चिंतन ७२
१०९. चूक ७३
११०. काचा.....७४
१११. वाट ७५
११२. चिंता ७६
११३. ह्या बागेत.....७७
११४. स्थापत्य ७८
११५. पानं.....७९
११६. दगडायण ८०
११७. ढग, पाणी आणि बर्फ.....८२
११८. एक इमारत.....८३
११९. रंगमंच.....८४
१२०. बदला ८५
१२१. वार्डरोब ८५
१२२. घर-१ .....८६
१२३. घर-२ .....८६
१२४. घर-३ .....८७
१२५. घर-४ .....८८
१२६. घर-५ .....८८
१२७. घर-६ .....८९
१२८. मल्टीपर्पज चेअर ९०
१२९. घर-७ .....९२
१३०. युनिव्हर्सल ट्रॅव्हलर्सचे स्वगत९८
१३१. आमच्याविषयी ९०
१३२. संभोगानंतर.....१००

पोरगी

पोरगी बसलीये
मी लिहितोय

पोरगी बसलीये
मी लिहितोय

पोरगी बसलीये
मी लिहितोय

पोरगी बसलीये
आणि कवितेतून उठायचं
नाव घेत नाहीये

पोरगी बसलीयेच

▪

शब्द

शब्दांनो

कुठे आहात?

कुठे आहात ?

हात

शिवशिवतायत

पार्वती

▪

गा णे

फडफड
पक्षाची नव्हे
छातीच्या पिंजऱ्यातील फाडफाड
फोडीची

तडतड
जीवाची नव्हे
ताडताड
न ताडता
जो ताडमाड
ताड
तोडून
गेला

त्याची

टणाटण
फुटाणा नव्हे
टणक
टोणगा
त्याच्यापुढे टोन डाऊन न करता

गा

▪

संगीत

शांतता भंग करत
संगीत
शांतता मोडून खातंय
आणि वाजवतंय
शांततेची पुंगी

▪

बन्दा

रुपया वितळवला
पण त्याची चिल्लर झाली नाही
नोट ठेवली
तर ती फाटली

आता हा फाटका खिसा वाजवत
जिथे तिथे हिंडतोय
बन्दा

▪

शुटिंग

एक पेंटिंग माझा खून करतंय
एक बंदिश मला जन्म देतीये
एक कॅमेरा मला शूट करून निघून चाललाय

आता मला फक्त मरण्याचा अभिनय करायचाय

तो ओके झाला
की थेट पॅकअप

▪

कदाचित

आता झोपतोयस
उद्या ह्या बेडवर कदाचित मेलेला सापडशील

स्वप्नात
श्वास ऐकत
जागा राहा
राजा, रात्र वैराची आहे

■

भाषित

भाषेतून जो चालतोय त्रिभाषिक
भुशभुशीत भाषेतून
भषभषीत भाष्यात
जो मातृभाषेस पारखा
मृतभाषेसारखा

तो
भाषिक त्रि
भाषेच्या वाळूत भाषेवर भाषत
समुद्राच्या मुद्रा समुद्रगुप्ताच्या मुद्रा गुप्त समुद्राच्या मुद्रा
मुद्रित करत मृदु मृदु मृद शोधत मृदुंगांत
मदमोदक मद्यमादक आमोदी
'मूड' घूस घालत
धुडघूस घालत
घुसत घुशीसारखा
मुसभुशीत भाषेतून भाषत
संभाषत
भाष्कळ

एकटा आहे

ये

■

पोंगल

दे थोडी तुझ्या स्तनांच्या लोणच्याची फोड
माझ्या आईच्या दूधाला येऊ दे चव
हा आयुष्याच्या पोंगल भात
संपवून दे मला माझ्याच रसासक्त जीभेने
आतल्या आत

ही राईस प्लेट छापली जाऊ दे गनिमी
आतड्याच्या सूर्यबाज बदफैली कागदावर जमिनी
आणि राहू दे तळटीपेत जामीन
तुझ्या स्तनाच्या लोणच्याची तिखट सही आमीन

■

गोलकीपर

माझ्या डोक्याला लाथ मारून
माझे पाय वाट पाहतायत हवेत
गोल होण्याची

गोल होत नाहीये
आणि पाय आयुष्याच्या नावाने त्यांची दाही बोटे मोडून
पुटपुटतायत
''लाथों के भूत कभी कभी लाथों से भी नहीं मानते''

मैंने लेटेस्ट सुना है
''अब बातों से बात चल रही है।''

और बात
गोलकीपर तरह डटकर खड़ी है।

■

जे तुमचे आहे

जे तुमचे आहे
तेच वापरेन तुमच्या विरुद्ध

हे युद्ध
जे आहे तुमच्या विरुद्ध

करेल उद्युक्त
तुमची आत्महत्या

ही आत्महत्या नावाची बाई
जिची येते तुम्हाला चीड
चीड चीड करत राहील

चाड येईतोवर
चहाडी करत राहील तुमच्यात

आणि शेवटी तुम्हीच ठाकाल तुमच्या विरुद्ध

तुम्ही आहात
ही अफवा
हवा गरम करणारी

तुम्हाला हातही न लावता
कोसळेल
मीच पेटवलेल्या ह्या थंडीत

▪

शंका

ह्या वाईट चवीच्या शतकातून
मी माझी जीभ
कवितेच्या पदराखालून घेऊन चाललोय

मला वादळवाऱ्याचे भय नाही
फक्त ती ह्या शतकाने नासेल की काय
अशी मला शंका आहे

▪

हातरुमाल

ते दूरवरचे झाड
मला शूट करायचे नाही
जे मला दिसतंय

मला शूट करायचाय
माझा हातरुमाल
जो मला दिसतोय
पण जो मला कळत नाही

हा माझा हातरुमाल
जो माझ्या हातांना मालामाल करेल

▪

महादगड

एक महादगड
पक्ष्यावरून उडत चाललाय

आणि पक्षी
कोणत्याही क्षणी कपाळमोक्ष होईल म्हणून
जागच्या जागी खिळून

▪

हॅट

ह्या हॅटखाली दडलंय काय?
कुंडली?
चुगली?

ही हॅट
जिच्यातील माझं डोकं मला दिसत नाही
माझे पाय घालून
कुठं चाललीये?

▪

मी झाडाला झाड झाड झाडलं तेव्हा

मी झाडाला झाड झाड झाडलं
तर फुलेच पडली झडझडून माझ्या सुरवंटी त्वचेवर
मग मी फुलवत फुलवत फळवत फळवत
खोडत नेलं माझं रक्त
तर माझं हृदयच माझ्या मूळाशी आलं

कालांतराने
माझ्या त्वचेचं फुलपाखरू उलटं करून मी पाखरलं तर
झाड लटकले त्याच्या रंगाना झाडाझडती घेऊन
अंगभर पसरला पेंटिंगचा पेटंट वास
आणि कधीही पेट घेईल असे टर्पेन्टाईन
आईन्स्टाईन आणि व्हॅलेन्टाईन
ह्यांच्या दरम्यान

आता माझ्या हातात लायटर आहे
आणि काळजात सुरू झालीये
फॉस्फरसची चूळबूळ

आता 'मी' माझ्यातलं झाड जाळू
की झाडामधला 'मी' जाळू?

▪

अटळ

माझ्या उजव्या कानात मळकाडी घातली
तर डाव्या कानातून आख्खा मेंदू थेट बाहेर

तो बुडेल म्हणून त्याला दिला बळकाडीचा आधार
तर पाण्यात अंधार होऊन
फिरू लागली एक अधांतरी धार

ती तुकडे करेल मेंदूचे म्हणून मी फेकली तिच्यावर कळकाडी
तर तिच्या मोडण्याचा आवाज
थेट मेंदूत कोसळला
आणि डावा मेंदू अलग झाला उजव्या मेंदूपासून

आता दोघांपैकी कुणाला वाचवावं म्हणून
मी छळकाड्या टाळत
ह्या आवाजात पोहतोय
तर एकेक जाळकाडी
माझा निर्णय जाळण्याचा बेतात
ड्रॅगनसारखी बसलीये

मी कुणालाही वाचवलं
तरी जळून मरणाराय
ह्या शरीराच्या बुद्धिमान पाण्यात

▪

ज्योतिषा

हाताच्या चिमूटभर चिमटीत पकडून रसिकांचे कान
जो वाजवतोय व्हायोलीन लीन
व्हाया वीण
त्याचे भविष्य सांगताना
सावध रहा

कदाचित
हात उजाडेल

▪

बिनडोक

जोपर्यंत तिच्यातून रक्त येत नाही फुटून
तोपर्यंत आपटत राहीन मी ह्या भिंतीवर
माझं डोकं
ज्याला तुम्ही खोकं समजता
मला बिनडोक बनायचंय
जगायचं फक्त माझं हे काळीज
जे मी कधीपासून तळहातावर घेऊन फिरतोय
माझे हात काळजाला बांधले गेलेत म्हणून
अन्यथा
ही भिंत माझ्या डाव्या हाताचा मळ आहे

▪

दुसऱ्यानं काय गुन्हा केलाय

हा दुसराच डोळा कसा रक्तबंबाळ
ह्या पहिल्यानं काय पुण्य केलंय

हा एकच पाय कसा गळलाय
आणि दुसरा त्याचा स्टम्प करून त्याला बॉल काय टाकतोय

आणि हा हात जो छातीतून उगवलाय
कसा काय क्षेत्ररक्षणाला उभाय फुप्फुसं पकडण्यासाठी

आणि केस कुठं उडत चाललेत
कानात बसून

आणि हे प्रेक्षागारात माझ्या दातात बसून
कोण चुळा भरतंय
जीभांच्या

▪

काळ - १

काळ घड्याळातून वाहिला असता
तर हे हात अमर झाले असते

प्रिये
ही घड्याळांची डाळ
माझ्यासाठी शिजवू नकोस

काळाबाबत मी
नॉनव्हेज आहे

▪

काळ - २

शरीरे तर कधीच गेली मरून
त्यांची भुतेच खरी वाटतात
भविष्ये तर कधीच येत नाहीत शरीरे घेऊन
त्यांची अद्‌भुते बरी वाटतात

प्रिये
हा वर्तमान नसतो कधीच जून
नीट जगता येत नसेल अजून
तर बिनकामाचा आहे

▪

मराठी

''हे मॉडेल मोडेल
पण वाकणार नाही''

तू घोषणा करून मॉड मिडीत
निघून गेलीयेस
आणि कॅमेरा आशाळभूत

खिडकीतून शोधतोय
तुझ्या पाठीतून
तुझी छाती

जी मराठी होती

▪

निघून जा

तुझा फोटोग्राफिक किस दे
ह्या काळाच्या भरगच्च लाईटीत

माझा आटोग्राफ लाईटवेटेड
घेऊन जा
बाई पिऊन टाईट होणाऱ्या ह्या ओठातून

ह्या ओढाळाला ओठाळ कर
आणि ठणठणीत बरी होऊन
निघून जा
लाईटवेगाने

ह्या सोलरखालून

▪

शाबूत

ह्या चंद्रापेक्षा खुळा
ह्या सूर्यापेक्षा वेडा
ह्या आकाशापेक्षा पागल
ह्या जमिनीपेक्षा सिझोफ्रेनिक

तो

जो मांडून गेलाय हे मेंटल असायलम माझ्यात

त्याचे रक्तरंजीत कण उत्क्रांत होतायत
प्रेमाच्या गिलोटीनखाली

तो डोकेबाज नाही
म्हणून मी शाबूत आहे

▪

कटी पतंग

कवितेसाठी कोण चाललंय आतबट्ट्यात
सगळेच कवी कट्ट्यावरून
कटी पतंग पाहत

मांजाचा दोरा
जो उडवणाऱ्याचीच बोटं कापतो
कुणीच हातात धरत नाही

आणि तरीही आकाशात पतंग
रक्तबंबाळ बोटे पाहत
रंगीन

कवितेसाठी कटण्याची वाट पाहत

कोण उडवतंय?

▪

मासे, माश्या आणि माणसे

मासे लढतायत मास्यांशी
माश्या लढतायत माश्यांशी
माणसे लढतायत माणसांशी
पाण्यात
आणि गातायत गाणी
अश्रूंची
जे लढताना पाण्यात आढळत नाहीत

▪

माणसा

ह्या हातांनी किती जणांना हात दिलास
आणि ह्या खांद्यांनी किती जणांना खांदा

हे डोकं किती जणांसाठी लढवलंस
आणि हे पाय
किती जणांच्या पोटावर दिलेस

गळ्यापर्यंत बुडालेल्या माणसा

▪

खिडकी

खिडकीबाहेर पक्षी उडतायत की ढग

खिडकीबाहेर
आकाश आहे की भिंत

खिडकीबाहेर
तार आहे की वार

खिडकी बाहेर आहे की आत

▪

ड्रॉवर्स

हे ड्रॉवर्स कुठं चाललेत
माझ्या आयुष्याची मॅच ड्रॉ करून

अरे कुणीतरी ड्रॉ काढा
कदाचित त्यात माझा नंबर लागेल
जो थांबवेल

सपासप माझ्यातून निघून चाललेले हे ड्रॉवर्स
स्क्रू-ड्रायव्हरने
मला घट्ट करून

कुणीतरी या
ह्या माझ्या देहाच्या बेबंद कपाटात

▪

भुकेचा स्टो

हा श्रावण घेवडा की आषाढी बेवडा
हा कार्तिकी दोडका की मार्गशिर्षी व्होडका

ही भाजी की फाल्गुनातली पाजी

हा पातेल्यातला शिमगा
पाण्यात मारतोय बोंब

त्या झाकणाने त्याचे तोंड कायमचे मिटवून टाक
आणि बंद करून टाक
भुकेचा स्टो

▪

बाहुली

ही बाहुली
जिचं पोट वाढलंय
माझी चरबी खाऊन
माझ्या डोळ्यांना करतीये ॲटरॅक्ट

वेडगावच्या त्वचेला जाऊन
पेडगावची त्वचा पांघरत

तिचे आर्टिफिशीयल पाय
माझ्या सुपरफिशीयल पोटावर पाय देऊन
माझ्या भुकेत चालतायत

ती नागडी नाही
तिच्या अंगावर आहे माझ्या पापणीचे कांबळ

तिची बेंबी
थेट परमेश्वराला भेटून आल्यासारखी खोल

आणि ती होतीये
मागे पुढे
मागे पुढे
माझ्या अवयवातील हवामान खात्याच्या
गुप्त अंदाजानुसार

ती बाहुली आहे
आणि मला खेळवतीये

▪

वीरमरण

अंगभर उगवलेत
मला वाहिलेली औपचारिक फुले

माझे वीरमरण
शेवटी सुंगधात नासले

▪

प्रिये

हा ॲनाटॉमिक बॉंब
टाकू नकोस माझ्या डोळ्यात

माझी बाहुली जापानी नाही
इंडियन आहे

नष्ट झाली तर कदाचित
पुन्हा उभी राहणार नाही
आणि तूही नाहीस अमेरिकन हाताची

प्रिये
ही कांजीवरम साडी म्यानासारखी वापर
आणि संयमाने हळूहळू मला काप
वारावाराने

▪

पुतळा

एक पुतळा नागडा
थेट येतोय खिडकीतून खाली

झेलावा
तर बाईला मिठी मारल्याचा फील
सोडावा
तर बाई रस्त्यावर फुटण्याची भिती

कधीपासून रस्त्यावर हा असा
मी हँगिंग गार्डनसारखा

माझ्यातून कित्येक शतकं
ये जा करतायत
पुरुषांची

▪

सरड्याप्रमाणे रंग बदलणाऱ्या ऋतूत

ही जी माझी पापणी हिरवी
भाजीसारख्या ताज्या
सवाष्ण बांगड्या केसांच्या वाजवत
गेली भगव्या पायांवरून माझ्या
तर त्यांची दाही पिवळी बोटे कुडबुडी
निळ्या जमिनीवरून तांबडी माती उकरत
टाळू लागली तिची तपकिरी नजर तिच्यातील हुडहुडी

सफेद पावलं टाकत पोपटी हत्ती
तिच्या कडेलोट आसक्तीत
त्यांच्या निळ्या दातांची मिशी पिळत
टपकले माझ्या गुलाबी अंगासमोर निधड्या छातीने
इंद्रधनुष्य चरत

पांढरं पडत चाललेलं जंगल त्यांच्या पावलांनी
आणि त्यावर कोसळणारा जांभळा बर्फ मुलतानी

हा सरड्याप्रमाणं रंग बदलणारा ऋतू कुठून आला ह्या भर हस्त नक्षत्रात
हे मी स्वत:ला विचारणार तोच
सूर्य विझला काळ्या काळात

आणि मी करड्या अंत:करणात कोरडा होत
कायमचा आंधळा झालो
डोळ्यातील केसरी चंद्रात

जे दिसत नाहीत त्या सूक्ष्म कणांना प्रकाशमान करताना

▪

झोक

हातात खिळे ठोक
छातीत भाल्याचे भोक
पायांना बुलेटस् घुसून आलेले पोक

आणि तरीही
ह्या शवयात्रेत झोक असा
की
खांदा देणारे मेलेत
आणि हाच फक्त जिवंत आहे

▪

आंबा

हा आंबा
माझ्या खोलीभर पसरत चाललाय
त्याच्या वासानं
सूर्याला येतायत गोड गोड पिवळ्या शिंका

त्याचा गर गरगरतोय आतल्या आत
आणि साल
मऊ मुलायम ओठांनी किस करत
तिच्या कोकणी जीभेने
कण कण अनुवासिक करतीये

अरे कुणीतरी थांबवा
माझ्या खोलीतील आंबा

तो असाच वाढेल तर पृथ्वीभर होईल
आणि ही पृथ्वी कायमची
आंबून जाईल.

▪

अजीबोगरीब सतीगमन

ही मिनरल हवामानाची सररिअल दहशत
समुद्र वाजवतोय सेक्साफोनमधून
वाळूच्या टाळूवरचं लोणी खात

एक नागडी बाई पहुडलेली स्वत:च्या नवऱ्याच्या चितेसमोर
तिला समुद्र पोहून ओलांडून जायाचंय
हे सतीगमन कंपलसरी करणारे हवामान
आणि आकाशात तरंगणारा
तिचा रिबेलीयस स्विमिंग ड्रेस
दहशतीला घाबरून खाली येत नाहीये

वादळात मुंडक घोंघावतंय
तिच्या मेलेल्या नवऱ्याचं
आणि समुद्राच्या पाण्यावर पसरलेले त्याचे अवयव
वाट पाहतायत
तिच्या जळून जाण्याची

हे आहे फ्रीज झालेलं अजीबोगरीब सतीगमन
आणि मरण ह्या हवामानावर खूश होऊन
टाळ्या पिटतंय

▪

डोकं घडवताना

तुझं डोकं घडवता घडवता
लागला अधिकाधिक सूक्ष्म होण्याचा ध्यास
आत्ता ह्या अणूएवढ्या मटेरियलमध्ये
तुझं डोकं उतरलंय तर
फिरत नाहीयेत त्यावरून माझे फिनिशिंगचे हात

मला भिती वाटतीये
ते फुटून
माझा हिरोशिमा होईल

▪

सावली झाडाची

हे बाईचं गाढ झाड

दोन मोजक्याच स्तनांची आटोपशीर फळे
आणि हातांच्या दोन बलाढ्य फांद्या

ही थेट पृथ्वीत पोहोचलेली पायांची मूळं
ज्यांची खोली
हवेत ढगाप्रमाणं उडणाऱ्या आपल्या उथळ डोळ्यांना
दिसत नाही

आपण म्हणजे तिची पडलेली सावली

▪

आहे कुणात दम

आहे कुणात दम
ह्या शर्टाची छाती सिडयुस करण्याइतका

कोण शर्यत लावणाराय
ह्या पॅन्टीच्या पावलांबरोबर

हा हॅटचा पर्वत कोण चढून जाणाराय तुमच्यापैकी

आणि ह्या अंडरपॅन्टच्या मांड्या
कोण घेणाराय ह्या मध्यरात्री स्वत:च्या मांड्यात

नागड्यांनो
माझ्या ह्या वाळत घातलेल्या कपड्यांवर
नका ठेवू तुमचा वॉच

त्यांचा टेररीस्ट मॉक
तुम्हाला बुलशीट करेल
एका ठोश्यात

▪

मेकअप इफेक्ट

एक बाई सूर्यात पाहून
मेकअप करतीये
मला कळत नाही तिला सूर्यात
तिचा चेहरा कसा दिसतो

फक्त मेकअप संपतो तेव्हा
ती अधिक सुंदर झालेली असते
आणि तिच्या पायात असतो
आपण संध्याकाळ होईपर्यंत आरामात चालू
असा दमदार आत्मविश्वास

▪

ढग

एक ढग एका भिंतीवर धडका देतोय
एडक्यासारखा

एक सिंह वाळू खात डरकाळी देतोय
वाळवंटाची

एक अरब भले मोठे कुलूप घालून
लॉक करू पाहतोय आख्खं आभाळ

एक रस्ता एका मुलीच्या पायात स्वत:ला पाहत
स्वत:च डांबर नीट करतोय

आणि एक हात हे सगळं एका कॅनवॉसमध्ये बांधून
विकायला चाललाय मार्केटमध्ये
सुट्टीच्या दिवशी
भुकेल्या पोटी

▪

नळ, बटाटा, खुर्ची - इत्यादी

नळ
अंगाचा तीळपापड होऊन
पाणी पिऊन पिऊन
फुगत चाललाय

बटाटा
आतून धम्मकलाडू खाऊन
टकामका पाहतोय स्वत:च्याच डोळ्याचा नाकतोडा

खुर्ची
थंडा फराळ करत करतीये
हवेशी दोन हात

नारळ
घरादाराचे खोबरे करतोय
स्वत:ची शेंडी नारदासारखी हलवत

कढई
अकलेच्या कांद्याची अक्कल ऐकतीये फोडणीत
दोन कानांनी

टेबल
स्वत:च्या पाठीचं धिरडं काढत
चार पायांनी विचार करतंय शतपावलीचा

आणि पेन
माणसाचं मेतकूट जमवून
बॉलिंग करतंय आख्ख्या घराला

फक्त हा एक कंगवाच असा
ज्याचे केस खायाचे
आणि केस विंचरायचे दात वेगळे आहेत

मख्ख आहे

▪

आवाज

दरवाजा उघडताक्षणीच दिसलं

आकाशाचं अनपेक्षित मुंडकं
वाऱ्याची डासांनी भरून गेलेली रक्तबंबाळ पाठ
ताऱ्यांच्या रक्तबंबाळ हातातून वाहणारी वाळू
डोंगरावरील झाडे गळून त्याच्या अंगाला पडलेलं टक्कल

आणि मग उगवला
सूर्याचं कुलूप घेऊन काळाचा अजस्र हात
जो दरवाजापर्यंत पोहोचेपर्यंत
मी डोळ्यात मरून गेलो

मरताना ऐकू आला
लॉकचा घोगरा आवाज

जो माझ्याशी मिळताजुळता होता

■

आठवणी

माझ्या ह्या उजव्या हातात
एक पुरुष श्वास घेत
माझ्या ह्या डाव्या हातात
एक बाई लिपस्टीक लावत

माझी बोटं दुडूदुडू लहान मुलांसारखी
आणि माझ्या एका बोटातील अंगठी
आठवत बसलीये लग्नाचा गाठ दिवस
जो हा संसार थाटून
आठवणीतून पळून गेलाय

■

नवरामाचे स्वगत

हे भरत भरत जाणारं डीएनएचे भरतकाम
प्रोड्यूस करेल रावण आणि राम
बुद्धिमत्तेला करायला लावेल हाराकिरी
मायटोकॉंड्रियाला करेल अलेक्झांड्रिया कामूक
सेंटरला सेंट्रल जेलचा चाबूक
मायक्रोस्कोपमधून वाकुल्या दाखवेल क्रोमोझोमीक
आणि स्लाईडच्या काचेवर करेल ब्राईडडान्स जनुकपायांनी

हे भरत भरत भरतकाम
कधीच देणार नाही माझ्या हातात
माझ्या आयुष्याचा दोरा

आणि माझ्या पादुका माझ्या सिंहासनावर ठेवून
चोवीस तास
माझ्या चालण्यावर माझ्या चालण्यातल्या वनवासावर
अयोध्येतून राज्य करेल
माझ्या नावानं

हे भरत भरत भरतकाम
करत राहील माझं भरीत
रामायणी वांग्यापासून
आणि खाऊन पिऊन मिश्या साफ करून
पाहत राहील माझे अवतारी पाय

जे पादुकाविना मानवी असतील

■

कारभार

छातीत घुसलाय एक ड्रॉवर
जो उघडत नाही

डोळ्यात एक खिडकी
जी बंद आहे

पाठीला चिकटलंय एक टेबल
अटॅच्ड

पाय वितळून गेलेत बुटात

आता ही हॅट डोक्यावर घातली
की आटोपलाच कारभार

ह्या सगुण फर्निचरमध्ये

▪

वाढ

माझे डोळे
हळूहळू वाढतायेत लाखोत
माझं नाक हळूहळू मल्टीप्लाय होतंय
मी चालतो तेव्हा एका पायाचे दोन आणि दोनाचे चार होतायत
माझे हात विभागतायत स्वत:ला
अनेक हातात

आणि हे सगळं एका अमिबानं घडवलंय
ह्यावर माझाच विश्वास बसत नाहीये

अरे, कुणीतरी बिब्बा घाला
माझ्या अस्तित्वात

अरे कुणीतरी दाखवा ह्या अमिबाला
कुटुंबनियोजनाचा तो फेमस लाल त्रिकोण

▪

विश्वाचं इन्टेरिअर

ह्या विश्वाचं इन्टेरिअर
पाहिलंय कुणी

आपण तर रचल्या एक्स्टेरिअर गार्डनवरच
ॲडम ईव्हच्या कथा
आणि नेमून दिला परमेश्वर नावाचा काल्पनिक दरवान
राज्य करण्यासाठी

आता बागेत राहून कंटाळून गेलाय जीव
आणि कान
प्राण गोळा करून वाट पाहतायत
त्या जंगली डरकाळीची

जी इन्टेरिअरमधून बाहेर पडताना
थेट डर आणि काळ मारत
परमेश्वरासकट ही आख्खी बाग गिळेल

▪

नरसंपदा

जी बसलेली आहे
तीच नागडी आहे
जी बसलेली आहे तिच्या कपड्यात
स्वत:चे नागडेपण उपशीत

तिला ते सापडलं
की बसतीलच माझ्यासोबत तिचे अवयव डीनरला
तोवर माझी नरसंपदा
टेबलावर आहे
भांड्यात मांडलेली

▪

क्रिस्टलायझेशन

आकाशाने माझी त्वचा फाडावी
हवेने माझे श्वास बडवावे
ढगांनी माझी ओल सूर्याला झाकून वाळवावी

आणि मग सगळ्यांनी क्रिस्टलायझेशन करावे माझ्या अस्तित्वाचे
तिच्या हातातील हिरे नसलेल्या अंगठीत

▪

एक भिंत

एका भिंतीवर पडलीये भिंतीने गिळलेल्या
एका टेबलाची सावली

भिंत लावतीये चार मोसंबी
एक ग्लास दुधासाठी
आणि एक स्कूलबॅग भरलेली
ह्या टेबलाच्या सावलीवर

भिंत वाट पाहतीये
कुणीतरी नाष्टा करून
स्कूलबॅग उचलून
शाळेला जाईल

आणि ज्याला शाळेला जायचं आहे
तो कनफ्युज आहे
बसण्यासाठी कुठंच स्टुल नाही म्हणून

त्याला स्टुल हवंय
जे त्याला भिंतीपासून सावलीच्या अंतरावर ठेवेल

जेणेकरून पडणार नाही भिंतीवर
खाताना त्याच्या एकाही अवयवाची सावली
जशी एकेकाळी टेबलाची पडली होती

▪

जड आयुष्य

हे आयुष्य जड जड करणारं जडत्व
जाडजूड होत
जडावाच्या कामावर
जडवतंय जीव

नुसत्या वजनानंच मरशील
असाच जर राहशील

मेल्या
जिवंत राहायचं तर झाड अस्तित्वातलं 'झाड'
झाडझूड करत
झडव झीव
झडावावर

ज्याला नेमके कळतात
आयुष्यातील शिशिर आणि वसंत

▪

स्फटीक

हे टुकटुक स्फटीक
हे टीकटीक स्फटीक
हे टोकटोक स्फटीक

ही ठाकठीक स्फटिका
हे स्फूट स्फटीक
हे स्फोटक स्फटीक
हा स्फटिकांचा स्फोट
ही स्फटस्फट
ही फट

▪

बाजू

खिडकीच्या ह्या बाजूनं पाहताना
मला दिसतोय मी
सूर्यफूल व्हायचं की चंद्रफूल
ह्याविषयी कनफ्युज

माझा आत्मा
कशाचीच बूज न राखल्या गेलेल्या बुरुजासारखा
सतत बाजू बदलताना

माझ्या खोलीत
सतत कविता लिहिण्याची सक्ती
आणि तरीही आसपासचे पोलीस
कविता लिहिताना पकडतील अशी भितीही

माझे रंग सतत पालटते
माझे अंग सतत बदलते

मी कधीही उडी टाकून
आत्महत्या करू शकतो
खिडकीच्या ह्या बाजूनं स्वत:ला पाहत

▪

पोरगी

ही पोरगी आहे की हायब्रीड
हे केस आहेत की इलेक्ट्रिसिटीच्या शूजची लेस
हे स्तन आहेत की तापाला आलेली फणफण
आणि हे पाय जणू
नदीने केलेला उभा मलखांब

ही जादू हटवा माझ्या मंत्रमुग्ध डोळ्यापुढून
मूळचाच काळा आहे
हिला बघता बघता विठ्ठल होईन

▪

तीन शिराची बाई

तीन सिंहांचं शिर घेऊन
एक बाई चाललीये

तिच्या बुटावर वाळूचे कावळे
आणि हॅटवर एक छोटासा निळा हत्ती
ज्याची सोंड कायम आभाळाकडे
तिच्यापाठोपाठ तिचं वफादार काचेचं कुत्रं

ती चाललीये
भूकेनं कासावीस होऊन
आणि लोक तिला अदबीनं चहा-कॉफी
ऑफर करतायत

तिला माणसांची शिकार करण्याचीही धास्ती
कारण तिचे हातपाय तर माणसांचेच
आणि नाक्यानाक्यावर रायफल घेऊन
महाराष्ट्र पोलीस उभे

थम्सअप
वडापाव
भेलपुरी
तिचे डोळे एकेक स्टॉल जोखतायत
आणि आज गांधी जयंती असल्याने
सगळीकडे स्वखुशीने नॉनव्हेज बंद

तिचं डोकं शोधतंय
एखादं कुत्रं
एखादं मांजर

आणि तिन्ही सिंहांच्या आयाळी
कुठून ह्या बाईच्या फंदात पडलो
म्हणून हवालदिल आहेत

▪

निम्फो प्राध्यापिकेसमोर

ज्या बाईनं स्वत:च्या गुप्त अवयवावरच
टेलिफोन ठेवलाय
तिच्याशी तुम्ही आमनेसामने
काय बोलणार

ती पाडतीये साडीच्या पदरातून
आख्खं शहर
दोन कबुतरांच्या पायाला बांधलेलं
आणि तिच्या हातात तर चक्क एक सुरी
जी ती बाजूच्या फिशटँकवर आपटत
माशांच्या डोळ्याखाली मार्गदर्शनाचा आवाज काढताना

मला हव्या आहेत एम.ए.च्या नोटस
आणि ती तिच्या कालच संपून गेलेल्या
एम सी बद्दल बोलत

आता तिच्या पायाखाली मला दिसलं
माझंच प्रेत
म्हणून मी पळून आलो तिच्या घरातून
ह्यावर विश्वास ठेवाल?

▪

पांढरे ससे

जे 'नाही'
त्याला पकडतायत
जे 'आहेत'

ज्यांना पाहूच शकत नाहीत माझे मेंदू
जसे आहेत तसे

म्हणून तर हे पांढरे ससे
चंद्रावर

▪

जयश्या,

जयश्या, दरवाजा उघड.
काळजातल्या किंचाळीचा आवाज ऐकत
शांतलेला फुटलेली दोन शिंगे गाजरासारखी खात
मी उभाय

राजा, डबा उघड
खेकड्याच्या पाठीवर आख्खा टाऊन हॉल ठेवून
एक माणगावाहून आलेली भटकभवानी चपाती
श्वास घेऊ इच्छिते माझ्या तोण्डात

बण्ड्या, लूना काढ
बिंदू चौकातील तिळवे भांडारसमोरची जेल
अफाट वेगाने मोकाट धावत सुटलीये
आपणाला तिचा पाठलाग करायचाच

शरे, सिगरेट पेटव
मरलीन मन्रोच्या ढुंगणावरील तिळाचे ॲबस्ट्रॅक्ट
माझ्या आडनावात वितळवून
मला तिला 'वे' दाखवायचाय आत्महत्येचा आणि हत्येचा

मुलांनो,
(शरे, तुला मुलगी म्हणणं जीवावर येतंय)
तर मुलांनो
काळजाच्या वह्या उघडून लिहा
आपापल्या ॲक्शनल कविता

आणि मोडा पेन स्वत:च्या डोक्यात

▪

पेनाबरोबर एक संभाषण

बाबा रे
का तुझं तोण्ड खुपसलायस माझ्या तोण्डात
पेन आहेस म्हणून कवीशी कसंही वागायचं?

मी म्हणालो मला तोण्ड आलंय
तर डायरेक्ट जीभच पकडलीस
तुला काय वाटलं
माझी भाषा माझ्या तोण्डात सापडेल?

की माझं तोण्ड बंद करण्याचा
हा भाषिक मार्ग आहे?

बाबा रे हात-पाय कटलेत म्हणून काय झालं
जातीवंत हाडामांसाचा कवी आहे मी
तोण्ड बंद केलंस
तर ढुंगणानं लिहीन
पण लिहीन

▪

लाटा

लाटांनी आणून ठेवला
प्रथम पाण्याचा आवाज
मग बाटल्यांचे अपघात
मग शिंपल्यांचे योगायोग
मग शंखांचे उत्स्फूर्त भाषण
मग असेच कित्येक काहीतरी कशाचे तरी कुठूनकूठूनतरी

लाटांनी आणले नाही
पिण्यासाठी पद्धतशीर पाणी
आणि माझे अटळ प्रेत

▪

सॅम पित्रोदासाठी एक कविता

तू स्वत:ला आज टेलिफोन केलास काय
तू आज तुझा चित्रपट पाहिलास काय
तू रेडिओवरचा तुझा आवाज ऐकलास काय

सगळे ॲन्टिना मोडून
सगळे फॅन्टिना तोडून
का असा बसलायस
डिसकनेक्ट होऊन स्वत:त

की सकाळी, सूर्य पाठीवर घेऊन बावळटासारखा फिरताना
पाय मोडून पडलास
टेलिफोनच्या वायरी टाकण्यासाठी खोदलेल्या
सार्वजनिक खड्ड्यात?

▪

तास

हे अनलिमिटेड मोबाईल मांस
मला दे त्याचा घास

माझ्या त्वचेला लागलीये भूक
आणि आसपास नाही
एकही ऑटोमोबाईल
पळून जाण्यासाठी

बघ माझे दातही लागलेत थरथरायला त्वचेत
त्यानांही चुकलंय कळून

तास
घासफुसाचे संपून
मांसाहाराचे सुरू झालेत

▪

एक माणूस

एक माणूस आभाळापर्यंत पसरलेला
पक्षी गिळत बसलाय झोपेतल्या झोपेत
पाय फाकवून

त्याच्या गळ्यात गुणगुणतीये घोटांघोटांनी
त्यांच्या पंखाची फडफडती कुहू कुहू

छातीतून वाहतंय त्यांचं रक्त ज्यांना उडण्याची तहान होती

त्याचे बालक डोळे
फाडफाडून पाहतायत
त्याच्या झाडासारख्या दिसणाऱ्या उभार पायांवर
निरागस उतरणारे थवे
नव्या नव्या पक्ष्यांचे

त्यांना त्याला चिमटा काढून जागं करायचंय ह्या काळझोपेतून
आणि त्यांना चोचीच नाहीत

▪

किशोरी आमोणकर आणि तिची आई

ही जी मुलगी गुणगुणत चाललीये निर्जन रस्त्यावर
तिच्या आईचा इको आहे

तिचं गाणं मूळं शोधतंय झाड नसलेल्या अरण्यात
आणि तिची आई आईसएजमध्ये बसलेली

तिची मेटॅलीक मान हलवत अधूनमधून
पुनर्जन्माला दाद देतीये

स्वत:च्या

▪

न्यूड क्लबच्या किनाऱ्यावर

ह्या शेकडो बायका नागड्या
माझ्या आसपास
आणि मी त्यांच्यात
कपडे घालून

त्यांच्या त्वचा उडवतायत माझ्या कपड्यांची खिल्ली
आणि माझ्या झाकल्या गेलेल्या त्वचेला
त्या जोक म्हणून हसतायत

त्यांच्या हातात धारदार कात्र्या
त्यांनी त्या त्यांचे कपडे शिवणारायत
की माझे कपडे कापणारायत
काही कळत नाहीये

कात्र्या अधूनमधून
दबा धरून असल्यासारख्या दिसतात
आणि माझा जीव
कपड्यांच्या मुठीत अस्वस्थ पाहून फिदीफिदी हसतात

▪

बये

हा घोड्याचा नाल
का ठोकलास माझ्या पायात बये
ठोकलास तो ठोकलास
त्यांचं पेंटिंग काय करत बसलीयेस बये
पेंटिंग तर पेंटिंग
पण त्याला रिअल समजून
मला का ओढतीयेस त्यांच्या रणधुमाळीत बये

तू कुठं गेलीयेस निघून
हा टापांचा आवाज माझ्या खोलीत सोडून?

▪

ट्रेन

माझ्या लिंगावर एक ट्रेन उभीये
दौडण्यासाठी
रक्तवाहिन्या कधीच्याच टाकून बसलेत रूळ
वातावरणनिर्मितीसाठी प्लॅटफॉर्म
दहा तोंडानी वाजवतोय रेल्वेची शिटी
कोळसे तर जळून राख होण्यासाठी
सरसावून बसलेत आतूर

आता फक्त तिच्या हिरव्या कपड्यांचा लाल सिग्नल
गळून पडला
की झालेच

▪

हा महादगडाचा

हा महादगडाचा दगदगी भोपळा
हे दगडाचे दागी वांगे
हा धोंड्यांचा धडक भात
ही वाळूची वाळलेली उसळ

खा तुझ्या दगडी दातांनी
ही स्टोन डिश

आणि तोंड काळे करून निघून जा
जंगलाच्या दिशेने

जिथे खर्रीखुरी झाडे
तुझ्या भुकेत जिवंत असतील
तू खाल्लेल्या दगडांची वाट पाहत

जा
आणि रात्रभर ऐकत राहा
जंगलातून शहरावर होणारी दगडफेक

▪

सिल्की बॉडी

पडदे सळसळतायत
की तुझी सिल्की बॉडी
मिल्की लाईटीत

तुझ्या डोक्यावरच्या घरट्यातून
उडत चाललेत
तुझ्या केसांनी घातलेली
केशरचनांची कृष्णविभोर अंडी

एक पोलादी नख जांभया देत बाहेर येतंय
तुझ्या स्तनातून

मला संभोग हवाय आणि तुला आराम

तुझ्या प्रतिकाराची सारी शस्त्रं
तू मांडतीयेस नीट
तुझ्या बॉडीत

आणि मी विजयदशमीची प्रतिक्षा करत
तुझ्या शमी झाडाखाली
खुमखुमीत उभाय

▪

शिल्लक

...नंतर
शिल्लक
फक्त डोकं
आणि बोटं नसलेले हात

मग दोन पेनांनी चालत जाईन
नाहीतर काय करीन

▪

एक्जरसाईज

फुटबॉल उभा कापून
तयार कर दोन भांडी
एकातून पी माझा चहा
दुसऱ्यातून कॉफी
ओठावर उगवेल मैदानावरील गवत
तेव्हा त्यांची पिळ मिशी
गोलखांबांसारखी
मग उभी राहा मख्ख
कधीही न होणाऱ्या गोलची वाट पाहत

ज्यांना मैदानात उतरायचं नसतं
त्यांच्यासाठी हा खास एक्जरसाईज आहे

▪

मी माझ्या शब्दांनी देईन

निसर्ग नकलून
कागदावर उतरवून
दिला ठेवून जसाच्या तसा
तर ह्या हाताची मजा ती काय

मी माझ्या शब्दांनी देईन
समोरच्या झाडाला
निदान दोन काल्पनिक गुगली फळे
नोबॉल बदली टाकलेल्या एक्स्ट्रा बॉलसारखी
आणि एखादा एकनाथ सोलकरी साप
भाषेत सळसळत
फिल्डींग लावून बसलेला

▪

परीस

कित्येक ठिकाणी गेलो
ह्या देहातील लोखंडाचा परीस व्हावा म्हणून

पॅरीसमध्ये झिंक खाल्ले
टोकियोत फॉस्फरस प्यायलो
न्यूयॉर्कमध्ये प्लॅस्टिकचा बर्गर खाल्ला
व्हेनिसमध्ये पाऱ्याचे पाणी पिलो

पण हे लोखंड टणक
अखंडपणे उतरत राहिलं
स्वत:च्याच पायऱ्या
आणि साती खंडांचा खंड
हातात मळून
लावत राहिलं
अस्सल अंटार्टिक्टावरचा बर्फाळ चुना

आता प्रत्यक्ष वैकुंठ माझ्या दारात परब्रह्म घेऊन हजर
आणि माझे शरीर हे जमून आलेलं पान कसं सोडणार
म्हणून तोंडाचा 'ना' वासून
स्तब्ध

▪

आता बघायचं

भिंतीवर नरभक्षक लसलसती मुंडकी
टांगलेली

जमिनीवर एक छत्तीस गुणी कवी बांधलेला

आता बघायचं
भिंती वाकतात
की कवी पळून जातो

▪

मॉस आणि फंगस

त्वचेच्या जागी प्रचंड मॉस आणि फंगस
कानाजागी वटवाघळाचे वट नसलेले पंख
अंगावर प्लॅस्टिकच्या फुलाफळाचे जॅकेट साडीच्या जागी
स्तनांजागी दोन इलेक्ट्रीक बल्ब

ती चालत येतीये माझ्याकडे तिच्या रोबोट पावलांनी
आणि सांगतीये तिच्या आयुष्याची लाईव्ह स्टोरी
जिच्यातलं मला साधं ढेकूळही कळत नाहीये

शब्दांच्या जागी नेमकं काय आहे?

■

ताप

एक थर्मामीटर माझ्या अंगावरच तापाला
इस्त्री करतोय

माझ्या हाडात एक किटली
पाणी उकळतीये

एक पक्षी साखरेचे खडे टाकतोय

एक कुत्रा चहाचे दाणे फेकतोय
डिझाईन्ड चमच्यांच्या तोंडानी

काही मिनिटांतच बॉडीतील मरणाचे पाणी
जीव खाऊन उकळेल
आणि मी चहा होऊन
ह्या मरणतापाकडून
संपूर्ण पिला जाईल

उरेल शरीराचा निर्जीव कप
आणि तो उचलायला सुलभ व्हावा म्हणून
एक सोपा कान

■

निकड

तिच्या पायावरील हॅटमधून उगवतीये एक
दोनशे मजली बिल्डींग
स्टेनलेस स्टीलची
जिच्या टॉप फ्लोअरवरून दिसणाराय मला तिची खोली

चढायला फक्त
स्तनांच्या दोन गोल लिफ्टस्

आता तिचे कपडे काढू
नाहीतर काय वेळ काढू?

■

संगीत

हा टेलिफोन ब्लॅक मॅजिक झाल्यासारखा
वाजवतोय वायर त्याला कनेक्ट करणारी
जणू त्याच्या हातात व्हायोलीन दिलंय
चीड आणतोय

त्याचे कान खरंतर म्युझिकसाठी बहिरे आहेत
आणि त्याला वाजवायचा आहे
सगळ्या कोल्हापूरला ऐकू जाईल
असा बिग शॉट राग

माझे डोळे इरीटेट झालेत
आणि तो जणू दाद मिळाल्यासारखा
माझ्या कानात
त्याचं म्युझिक मुततोय

आता मी माझ्याच कानाखाली वाजवू
नाहीतर काय करू?

■

दहा बोटे

माझ्या दहा बोटांचे दहा अणकुचीदार थेंब
गळतायत
टप टप
टप टप
तिच्या त्वचेच्या टपावर

कधीतरी ह्या टपाला पडेल
कायमचे छिद्र
आणि छिद्रान्वेषी डिझेली तहान
माझ्या अकराव्या बोटाची
कायमची विझेल

▪

कॉम्प्युटर बॉयसाठी एक कविता

तुम्ही कॉम्प्युटर आणायचा म्हणताय
आणा
मीही आणेन एक डिसकॉम्प्युटर

तुमच्या की-बोर्डात मीही लपवेन
एक छपन्न गुणी मोर
जो बटन दाबताच पिसारा फुलवेल
तुमच्या मिलिटन्ट व्हिक्टरीजमध्ये
नॉना V शेपात

माय डिअर डिअर कॉम्प्युटर बॉय
कवी नेहमीच
प्राईममिनिस्टरच्या विरोधात असतो
गिलोटीनखाली मुंडकं ठेवून
किंवा गनपॉईंटवर

▪

गॅम्बलर

माझा एक हात
तीनपानीत
टाकतोय तीन पत्ते
आणि दुसरा
स्वत:च एक
उचलतोय

तरीही मला कळत नाहीये
पैसे देणारा दसपटी एक्का
माझ्यातला

मी बहुधा
जनेटिकली डीसऑरडरड
गॅम्बलर आहे

▪

नाश्ता

एक अंड
एक कोंबडा
आणि एक सूर्योदय

मी ओततोय एका विशाल डेथपॅनवर
आणि एक चिकन ऑम्लेट
एक मिसिंग तुरा डौलवत
दिमाखदारपणे चालत येतंय
माझ्या चवीच्या दिशेनं

माझी जीभ
बहुधा
माझ्या तोंडात आज आरवणार आहे

▪

कर्णा

ह्या कर्ण्यातून ऐकू येतोय
इतिहासाच्या आवाजाचा श्वास
आवाजाच्या भूगोलाची छाती
छातीतील आवाजाची भौतिकी
भौतिकीच्या आवाजाची जीभ

हा कर्णा
आभाळाच्या ह्या टोकापासून
त्या टोकापर्यंत
तांगड्या फासटून बसलाय खुर्चीत
सगळ्यांचे कान उभे करून
निवांत

आणि कान
आवाजी मतदानाने शांतता फेटाळून लावत
आवाजांची लोकशाही सेलिब्रेट करतायत
त्याच्या आसपास

कर्ण्याजवळ फक्त एक बोळकं तोंड
आणि कानांजवळ
असह्य झालंच तर घालण्यासाठी बोळे

▪

शाहू स्मारक भवनात एक शू

तीन अनवाणी पायांचा एक शू
डोक्याला हॅट लावून बसलाय टॉयलेटसमोर

पाय लेडीज
आणि त्याचे अंग तर जेन्टलमनचे

त्याला जोराची शू लागलीये आयुष्यात पहिल्यादांच
आणि त्याला कुठं जावं तेच कळत नाहीये

▪

कैद

तोच पोलादी शर्ट
तीच पोलादी पॅण्ट

घालून घालून
कंटाळलेली माझी त्वचा
माझ्या कॉस्च्युमचा डोळा चुकवून
रोज बदलतीये तिचा रंग
तिच्यावरील डिझाईन

आणि मी आतल्या आत
रोज नवी कात खात
मॉलेल्ड आहे

▪

आता काय समजावं

प्रथम तिच्या तोंडून
शब्द बाहेर पडतील म्हणून
मी पाहिली वाट
तर समेशरच बाहेर आली करत आवाज
मग जीभ येईल म्हटलं
तर फुलं आली लवलवत

आता वाट पाहतोय
तर काहीच येत नाहीये

आता काय मी
शांतता बाहेर पडतीये
असं समजावं
तिच्या ह्या मुखशुद्धीत

▪

जळणं

स्टुल जळतंय
त्याचे तीन पाय जळतायत

टेबल जळतंय
त्याचे चार पाय जळतायत

खुर्ची जळतीये
तिचे दोन हात जळतायत

दरवाजा जळतोय
त्याचे कीहोलीक डोळे जळतायत

कप जळतायत
त्यांचे कान जळतायत

पुतळे जळतायत
त्यांची नाकं जळतायत

बाटल्या जळतायत
त्यांची तोण्डं जळतायत

तिच्या संतापात
आणि ती घर सोडून चाललीये

ह्या सगळ्यांची
डोक्यात राख घालून

▪

उंचच उंच बिल्डिंग

ह्या माझ्या डोक्यावर
लंबकाप्रमाणे उंच उंच बिल्डिंग्ज
आंदोलतायत

त्या कोणत्याही क्षणी एकमेकाला
टक्करतील
आणि मी त्यांच्याखाली सापडून
ठार होईन

अरे त्यांना आवरा

किंवा मला काढून द्या
पाताळाकडे पळून जाण्यासाठी एखादी वाट

▪

ती कोण आहे

ती पुढे निघून थेट मिसळलीये जंगलात

मला कळत नाहीये
स्तन झाडांचे की तिचे
हात तिचे की फांद्यांचे

चार पावलांचा पशुवत आवाज
तिचा की त्यांच्या चालण्याचा

मधमाश्या कुठून उडतायत
झाडातून की तिच्या केसांतून

मला डंख बसतायत
तिचे की झाडांचे?

▪

अस्वस्थ

अफवा म्हणून उडालेली
तरीही त्या दिवशी सर्व पेपरमध्ये छापली गेलेली
माझ्या मृत्यूची बातमी

मी तिच्यासाठी आत्महत्येची उडी मारली
तेव्हा जी लावून तळमळून
तिनं घेतलं होतं माझं चुंबन
ती लिपस्टीक

मला भूक लागेल तेव्हा
माझ्या नकळत माझ्या खिशात टाकायचे पैसे

माझा कुठलाही दरवाजा उघडणारी
मास्टर की

आणि अधूनमधून धरला जाणारा
माझ्यापुढचा आरसा

हे सगळंच तिच्या पर्समध्ये आहे

आणि तीही लॉक केलेली पर्स
माझ्या घरात विसरून
तिच्या जाराला भेटायला गेलीये

ती त्याला भेटणार
ह्याचं मला दुःख नाही
पण ती येताना दुसरी पर्स आणेल
ह्या भयाने
मी अस्वस्थ आहे

■

निरोप घेताना

ज्या टेबलाला पाय नाहीत
त्या भिंतजोड टेबलावर
शूज ठेवून
मी दूध प्यायलो ग्लासातून
जो तिच्या स्तनासारखा नव्हता

घडयाळ
जे मी गिफ्ट म्हणून नेले होते
त्यात काटेच नव्हते

आणि मी ज्या संबंधाना लग्न समजलो होतो
ते प्रत्यक्षात झालेच नव्हते

शेवटी निरोप घेताना
मी हात हलवले
तर माझे पंजे तिच्या बेसिनमध्ये हात धुताना
मी विसरल्याचे माझ्या लक्षात आले

आणि मी अनवाणी पावलांनी चालत जाताना
तिची जी आठवण झाली
ती तिचीच होती
ह्याची मला खात्री नव्हती

■

समाधान

ह्या अनंतापुढे मी घेऊन फिरतोय
शब्दांचे आरसे
त्याला डोळे नाहीत म्हणून काय झाले

मला फेस टू फेस लढल्याचे
समाधान तरी आहे

■

कला

कला हाच जर समाजाचा विरोधी पक्ष
तर समाजाच्या सत्ताधारी बेंचवर बसून
का अरेस्ट करू पाहताय
माझी दोन हातांची कलात्मक बोंब

तुम्हाला बसून बसून मोड येतात
मला कोंब

एक सूप्त लढाई आहे
जी कधी वास्तवात गुप्त होते
कधी कल्पनेत प्रकट

वस्तऱ्याने मिशा कापता येतात
आणि गर्दनही

कापण्याचा हा प्रोग्राम जरा जपूनच ऑपरेट करा बाबांनो

कदाचित माझ्या हाताखाली असतील
तुमचे गुप्त हात
आणि माझ्या मानेखाली
तुमची अप्रकट मान

▪

कहाणी

ही टायटल्स आहेत की टाईल्स
ह्या टेल्स आहेत की टोल्स
हे फिक्शन आहे की फ्रिक्शन

मुली
तू दु:खानं सांगतीयेस तुझी त्याची कहाणी
आणि तुझे ओठ संशयास्पद आहेत

त्यांचा तुझ्या काळजापर्यंतचा ब्रिज तुटलाय एकतर
किंवा तू ज्याचा हवाला देतीयेस
त्याची वीट
दगडापेक्षा मऊ नाहीये
निश्चित

▪

प्रवास पूर्ण होईल तेव्हा

माझा माझ्यातला प्रवास
पूर्ण होईल तेव्हा
मला आठवणार नाहीत स्टेशनं
ज्यांनी मला आधार दिला होता
स्मरणार नाहीत वाहनं
ज्यांनी मला वाहतं ठेवलं होतं

एक प्रसन्न पाणी
माझी धुलाई करेल
आणि मी बेदाग होत
माझ्या डेथएण्डची मापं घेत
स्वत:चं कटिंग करत
स्वत:लाच पुन्हा शिवत

त्याला तंतोतंत फिट होईन

▪

मॅन्शन

ह्या मॅन्शनमध्ये जरा जपून पाऊल टाका

इथे आहे मृत पानांची जमीन
आणि मृत ढगांचे छत

इथल्या भिंती बिहारमधल्या कोळशांनी सारवलेल्या आहेत
आणि इथले भारावलेले फर्निचर
मृत माणसांची हाडे वितळून
मोल्ड केलेले आहे

भूक लागली की इथे मिळते मृत प्राण्याचे मृत मांस
तहान लागली की मृत समुद्राचे पाणी

हे शवागार नाही
पण इथला प्रत्येक डोळा
तुमच्या मृत्यूवर रोखलेला आहे

तेव्हा जपून
हे जिवंत माणसांनो

▪

कविता

कविता लिहायला लागल्यापासून
शंका येतीये
आपण कागदाचेच बनलोय की काय

माचीस बघितली की पोटात गोळा
लायटर बघितला की कपाळावर थेंब

ही दुनिया कोणत्याही क्षणी आपणास जाळू शकते
ह्याचेच एक भय
आणि दडपण
किती निरागसपणे मागतायत लोक
लिखाणात आग आणि धग

▪

डोळा

एक डोळा घड्याळात मिक्स करत
की मेस अप करत
मी चाललोय वेगात बसून उजव्या डोळ्याने

सभोवताली ना मांस ना रक्त
फक्त रेषा, वर्तुळ, त्रिकोण सरकतायत
एखादा फोरव्हिलर चौकोनमध्येच उलटतो
एखादा श्वास घेणारा त्रिकोण रेघबंबाळ होतो
एखादं वर्तुळ दुसऱ्या मोठ्या वर्तुळाखाली सापडून ठार होतं

मला काहीतरी व्हावं असं वाटतं
पण माझा भूमितीला सरावलेला त्रयस्थ उजवा डोळा
ना उदास होतो
ना रडतो

माझ्याच चार हाताच्या अंतरावर मला मी दिसतो अंधूक रेषात कैद
डाव्या डोळ्याने घड्याळ चावताना

▪

युद्ध

सूर्य उठवतोय रेगननं
मला गनपॉईंटवर ठेवून

माझी पाठ क्षेपणास्त्राला टेकलेली
जागी होतीये अण्वस्त्रक शतकात
हात रिव्हॉल्वरवर सारखे ताठ
घोडा चालवून चालवून करतोय त्यांना सैल

किती मैल मला अजून जगायचंय
ह्या युद्धभारीत
स्वत:ला असं ऑन करत?

दातावर जमलेली आण्विक धूळ
मी चळाचळा चुळा भरून मोरीत टाकतोय

माझ्या दातावर मी फोडतोय
पेस्टचा पांढरा बॉम्ब
तोंड उद्ध्वस्त होत फ्रेश होतंय

रात्रभर अंगात घेतलेल्या बुलेटस्
आता बाहेर पडायला अधीर

मी गुदद्वारात अंत:स्थ चाकू चालवून मोकळा करतोय त्यांचा मार्ग
आणि संडासात त्यांना वाट देतोय

धपाधप पडणाऱ्या बुलेटस्चा आवाज ऐकत
मी गुणगुणतोय
वी शॅल ओवरकम वन डे
पेपरात सर्वत्र युद्ध, लढाई, वॉर
मी डोळ्यांनी एकेक बातमी शूट करत
संपवतोय पेपरात छापून आलेला कालचा दिवस
जो आजसारखाच सुरू झाला होता

घराबाहेर सर्वत्र फायरिंग
बंदूक टाळून जगण्याचे दिवस कधीच संपलेले
मी एकेक गोळी पचवत चाललोय शांततेच्या दिशेनं

प्रत्येक नाका माझ्या विरोधात
माझ्या प्रत्येक जेवणात विष
मी प्रत्येक भाकरीत युद्ध फाडतोय
प्रत्येक घासात लढाई

माझी शांतता सगळं पचवत स्तब्ध

त्यांना वाटतंय मी प्रॉफेट आहे
आणि मला माहितीये
मी कवी आहे
ज्याला कवितेसाठी स्वच्छ कागद मिळत नाहीये

ते शोधतायत
मला संपवता येईल असा एखादा न्यूट्रॉन किंवा तत्सम बॉम्ब
फक्त मीच जाणतो
माझा मृत्यू त्या न मिळालेल्या स्वच्छ कागदात आहे

▪

कालातित थंडीत तो

सगळे कागद पचवून
जो बसलाय जाऊन
रिकाम्या माचिसच्या उत्तुंग ढिगाऱ्यावर
त्याला शोधायचा आहे अग्नी
त्याच्याजवळ आहे लायटर
जो टायरइतकाच कठीण झालाय

त्याच्याजवळ आहे स्वत:ला शांतीरसानंतरचा
अकरावा रस समजणारा फॉस्फरस
जो फक्त फुसफुसतोय एका ज्वलंत काडीसाठी

आसपास
अडोसपडोस
सगळं बुडून गेलंय ठोस बर्फात

सगळे ज्वालामुखी
स्वत:ची तोंडे विझवून
महादु:खी हिवाळा चोखतायत

जगातल्या समस्त वाती -
एकहाती
वात आल्यासारख्या ज्योतीविना गडबडून गेलेत

प्रत्येकाला पळून जायचं आहे ह्या कालातित थंडीतून
आणि प्रत्येकाचा डोळा खिळलेला
त्या उत्तुंग ढिगाऱ्यावरच्या
एकुलत्या एक माणसावर

ज्याला फक्त नजरेनं
ह्या अफाट कचऱ्यात
गारगोट्या शोधून
अग्नी पेटवायचाय
पोटातील कागदाचा कॉन्टॅक्ट येऊ न देता

▪

शहर - फर्स्ट व्हिजिट

कितीतरी वेळ चालल्यावर
मला कळाले ह्या शहरात रस्ते नाहीत
साप आहेत

मी भयाने टॅक्सी थांबवली
तर दरवाजाऐवजी उघडले शार्कचे तोंड

आत बसलो तर सीट सीट नव्हतीच
गोगलगाय होती आरामात पहुडलेली

मीटर टाकले तर पाऊस पडायला सुरुवात झाली आकड्यात
आणि ड्रायव्हर वळला तर
हॅटजागी होता चक्क तरगंता ढग

चालवणारा तरी निदान माणूस आहे
असे समाधान मानणार
तोच त्याने विचारले फिल्मी आवाजात
''कहाँ जाना है?''
आणि मला तो जिवंत नसल्याचा संशय आला

आजपर्यंत
त्याला मला सांगता आलेलं नाही
ह्या शहरात मला कुठं जायचं आहे ते

▪

शवपेटीतून

बर्फाच्या गाठी मारून
उन्हाच्या दोराने
हे कुणी नेटवर्क वळलंय
माझ्या डोक्यावर

जेव्हा हवा तेव्हा उन्हाळा
जेव्हा हवा तेव्हा पावसाळा
ह्या काचबंद शवपेटिकेत

अधूनमधून झाकण उचलून
कुणी चेक करतं
माझ्या मृत्यूच्या पायऱ्या

स्टेप बाय स्टेप स्टडी स्टेपल केलेला
पल पल का हिसाब
पल पल की कलकल

माझ्या शरीराला पडलेल्या बुलेट होलमधून
पाहत बसतात माझ्या पेशींचे डोळे
माझ्या हत्याऱ्याचा चेहरा हताशेवर लिहिलेला

मसाले भरून ठेवलेल्या ह्या पारतंत्र्यात
फक्त पोस्टमार्टेम पाहण्याचं मांसल स्वातंत्र्य

फिलासॉफर्स स्टोन
भीष्माची शरपंजरी
एक्झिस्टेन्शियल कॉन्सपिरसीचा पीस
काय काय ऐकतोय
मरून गेलेल्या ह्या दोन कानांनी

मी वाट पाहतोय
कुणीतरी निदान माझ्या प्रेतावर तरी
हक्क सांगायला येईल

कुणीही येत नाही
लाकडाच्या किंमती आभाळाला भिडलेल्या आहेत बहुतेक

■

सेकण्ड हॅण्ड मार्केट

आसापास सगळं
सेकण्ड हॅण्ड मार्केट
आणि मला तर फर्स्ट हॅण्ड सेक्स अपीलशिवाय
काही भावतच नाही

एकेक इमिटेशन इमॅजिनेशनचा खून करत

ही कृत्रिम ज्वेलरी
फर्स्ट हॅण्ड गळ्यात
ही सेकण्ड हॅण्ड पुस्तके
फर्स्ट हॅण्ड हातात

ह्या थर्ड हॅण्ड डिलिव्हरी थड लावत
ह्या फोर्थ हॅण्ड मशिनरी मढं उभं करत

हा काळा बाजार
हा पांढऱ्याचा आजार

मी मरायला तयार आहे
आणि त्यांना सापडत नाही
ओरिजनल क्रूस

■

महावाक्य

काळाच्या प्रत्येक कणात
एक अलिखित महावाक्य
'माहीत नाही!'
आणि मी प्रत्येक क्षणाला सगळं माहीत असल्याचा अभिनय करत
फिलॉसॉफरच्या भूमिकेत बंद

माझी त्वचा मेकअप आहे कपड्यांचा
माझे कपडे मेकअप आहे कापसाचा
जो शेतातून निघतानाच
जळून गेला होता

हा माझ्यात भूमिगत झालेला प्रकाशाचा चाकू
ह्या प्रकाशक सॅटेलाईटमधून माझ्यावर नका टाकू

माझा चेहरा मेणाचा आहे
आणि शरीर शेणाचे

मला माझी एक्झिट
सन्मानपूर्वक इनव्हिजिबल ठेवायचीये

मला जाऊ द्या
स्पॉट न होता

▪

चिंतन

चावीसारखा दिसणारा एक गृहस्थ
पद्मासन घालून बसलाय

बहुधा चिंतन करतोय
तो कुठल्या कुलुपाचा आहे

▪

चूक

चुकीच्या मांसात घेऊन चुकीची हाडं
उलगडत अवयवाची बाडं
ती समोरली सफ्रेम
तेव्हा माझ्या काळजातलं प्रेम
रेपच्या स्पीडनं तिच्यापर्यंत पोहोचलं

आम्हाला कळत नव्हतं
काय नैतिक
काय अनैतिक

आम्ही ननैतिकासारखे गात बसलो
चुकीच्या ओठात चुकीच्या चुबंनांनी
नेतीनेतीचा चुकीचा पाढा अनंतापर्यंत

एका चुकीच्या बेडवर चुका मारल्यासारखे
आम्ही एकमेकाच्या प्रलयात चुकचुकलो
मुकमुकलो
भुकभुकलो
आणि शेवटी लुकलुकलो

एका चुकीच्या क्षणी आम्ही चुकचुकाटात जागे झालो तेव्हा
माझ्या चुकीच्या बोटाने
प्रेग्नंट केलं होतं तिच्या चुकीच्या पोटाला

आणि आम्ही वापरलेला कंडोम
आयफेल टॉवरसारखा
थेट छताला होता भिडलेला
एका चुकलेल्या अँगलमध्ये
जागोजागी बाहेरून फाटलेला
आतून चिडलेला

▪

काचा

काचा
उभ्या
आडव्या
तिरक्या
वर्तुळी
चौकोनी
त्रिकोणी

आवाज करतायत मेंदूत
मेंदूचा आवाज येतोय
काचांतून

खिडकीपासून दुर्बिणीपर्यंत
आख्खा प्लॅनेट
काचा
स्वत:च्या आवाजात वाजवतायत

काचा तडकतात
भडकतात
सडकतात
हडकतात
कडकतात

काचा काचतात कोचतात कचकचतात कच खातात
काचा काचांतून चालत जातात काचाखोचा शोधत काचबंबाळ होईपर्यंत

काचा रंगीत
काळ्या
पांढऱ्या
निरंगी

काचा पोहोचवतात
जे जसं आहे तसं

काचा
भ्रमवतात दमवतात
दाखवतात
जग तसं जसं नसतं

काचा
काहीही होतात
भांडी
बरणी
आवरण
फिशटँक

काचा
बुलेटप्रूफ
वॉटरप्रूफ
हे प्रूफ
ते प्रूफ होतात

काचा
डोळ्यात
आयुष्य सोसतात

काचा
शोधतात
मुक्तीचा पारा
जो त्यांना आरसा बनवेल

▪

वाट

मला वाचणाऱ्याचे डोळेच ओरबाडून घ्यायचेत
मी वाट पाहतोय
माझ्या वाघनख्या शब्दात ट्रान्सफॉर्म होण्याची

▪

चिंता

चिंतेचा चीक
वाहतोय मेंदूतून
बोट लावीन तिथून चिंतेचे तंतू

एक चिंतामानवच बसलाय आत
चिंतेचं जाळं फैलावत
उड्या मारीन तिथं
गुढ्या उभ्या राहतात चिंतेच्या
बूड टेकीन तिथे बुडबुडे येतोयत चिंतेचे

फ्रंट पेजवर सर्वत्र माझा फोटो
'ह्या चिंतेपासून दूर राहा'
असा इशाराही

कुठल्या ग्रहाच्या चिंतनातून माझा जन्म
कुठल्या सूर्यमालेच्या चेतनेचा मी चिंतू

मला आईबाप नाहीत
आणि ह्या पृथ्वीवर
परग्रहवासियासाठी अनाथाश्रम नाही

मला फक्त उडायचंय
'उड उड रे चिंतू
तुझे सोन्याने मढवीन तंतू
पाहुणे महासंतू
घरा की गा येती'
म्हणत

टायटल साँगमध्ये
जे चिंतेनं माझ्यात रचलंय

▪

ह्या बागेत

ह्या बागेत
फुले त्वचेतून उगवत नाहीत
पोटातून उगवतात
आणि त्यांची मूळे थेट
दगडाला टेकून असलेल्या जठरवेलीत

हे खांब ॲल्युमिनीयमचे
कित्येक मिलेनियम्स मिलीमीटरमध्ये पचवून
मिली? नहीं मिली? च्या संभ्रमात विक्रमवार उभे

त्यांच्या डोक्यावर सोन्याचे गवत आहे
आणि मॅकेनाज गोल्डसारख्या फिल्मी कथावर
त्याचा अजिबात विश्वास नाही

इथे श्वास हिरवे दिसतात
उच्छ्वास पिवळे

नाक कापण्याचे कित्येक फार्म्युले
इथल्या निसर्गाला ज्ञात आहेत
आणि इथली माती
माणसांच्या तळव्याची त्वचा सोलण्यात वाकबगार

इथे तुमचे कदम कदम बढाये जा
काही कामाचे नाही
मुंगीवर पाऊल पडू नये ह्याचीही दक्षता घेणारी स्थितप्रज्ञ
ज्ञानेश्वरी पाऊले
इथे वेलकम आहेत

▪

स्थापत्य

ह्या कागदावर

ही सिटी रचताना
हवा खेळावी म्हणून
घरांना खिडक्या असतीलच
असं नाही

गाद्यांजागी ठेवली जातील
कदाचित चोवीस तास जळणारी लाकडं
आणि खुर्च्या बनलेल्या असतील
उंदरांच्या शेपट्यांच्या

टेबलांना हत्तीचे पाय दिलेले असतील
आणि चादरी लोखंड वितळवून
पातळ केलेल्या असतील

इथे गॅरण्टी नसेल वॉर्डरोबची
आणि घरात नागड्याने हिंडता यावे म्हणून
जिथेतिथे आरसे असतील

ह्या सिटीतील रस्ते
पाऱ्याचे
आणि दुकाने
वेडीवाकडी हवेला टांगलेली असतील

इथे दातांच्या भाज्या मिळतील
आणि ताक म्हणून कदाचित
पांढरे केलेले रक्त दिले जाईल

इथल्या फॅक्टऱ्यांना असतील
कदाचित ढगाची कौलं
आणि मंदिरात कदाचित
देव ठेवले जाणार नाहीत

ह्या कागदावर
सिटी रचताना
ती कुणालाही हवी तेव्हा साध्या केसाने कोसळवण्याची
सोय केली जाईल

आणि जेव्हा एकाची सिटी कोसळेल
तेव्हा दुसऱ्याच्या सिटीला
केसाएवढाही धक्का लागणार नाही

■

पानं

हे एक पान तुझ्या हिरव्या हाताचं
हे एक पान माझ्या भगव्या हाताचं

हे एक पान निळ्या आकाशाचं
हे एक पान मातकट जमिनीचं

हे एक पान नदीचं
आणि हे पिवळं सूर्याचं

हे
हे
आणि हे

असंच
कुणाकुणाचं

आता पिस
आणि बघ

त्यातून एक आख्खा वृक्ष बाहेर येतोय
डोळे न फाडता बघ

■

दगडायण

कुणीतरी रचतंय
दगडावर दगड
दगडावर दगड
दिवसभर पोटाचा गड लढवत

दगड येतायत
आभाळातून
जमिनीतून
झाडातून
माणसांच्या काळजातून

लोक ज्या दगडावर डोकं आपटून घेतायत
ते सारे दगड
स्वत:च्या पायांनी त्याच्याजवळ पोहोचतायत

त्याला काहीतरी बांधायचंय जे भव्य असेल

तो हनुमान नाही राम म्हटलं की काम फत्ते व्हायला
किंवा वरदहस्त राक्षसही रातोरात अंबाबाईचं मंदिर तयार व्हायला

त्याला दोन हात आहेत झपाटलेले
आणि तो रचतोय
दगडावर दगड

दगड त्याच्या आज्ञेत नाहीत
पण विरोधकही नाहीत

दगड तयार करतायत काळ्या पायाचा जिझस
जो क्रुसाशी फुटबॉल खेळतोय

दगड तयार करतायत गणपती
जो सोंडेने 'मावळलेला सूर्य' पूर्वेकडे पोहोचवतोय

दगड सेक्युलर नाहीत
पण दगड असल्याने सिक्युअर महसूस करतायत

त्यांच्या चर्चमध्ये 'नमाजी' रामाची आरती गातोय
आणि आईन्स्टाईन तिला साथ देतोय व्हायोलिनची

त्यांच्या सूक्ष्मदर्शकात शेक्सपियर त्याला समजलेला तुकाराम
कनफ्युशिअसला समजावतोय

दगड जे त्रिकाणापासून सुरू होतात
अनपेक्षित वर्तुळात संपतायत

मनोरम मनोरे दगडाच्या अंगाने जातायत

टॉवर्स टो उंचावत अचानक जापानी झेन भिक्खूसारखे
बुद्धाच्या कमळात वाकतायत

दगड उभारतायत काहीतरी असं
ज्याला काय म्हणायचं
ते त्यांनाही कळत नाही

दगड हळूहळू काहीही म्हणण्याच्या पलिकडे चाललेत
आणि लोक
दगड आज काही उद्या काही परवा काही म्हणतील असं म्हणत
दगडांभोवती जमतायत

दगड काहीही म्हणत नाहीयेत
आणि दगडराव फक्त रचतायत
दगडावर दगड
दगडावर दगड
दगडावर दगड

■

ढग, पाणी आणि बर्फ

या
ह्या चेंडूसारख्या घरात
तुमचं स्वागतच आहे

हे विशाल पात्र
इथे ढग, पाणी आणि बर्फ
एकत्रच वाहतात

हा फिशटँक
थेट समुद्रालाच मिळतो
आणि माश्यांची येजाही थेट तिथूनच इथं

हे तळघर
थेट पृथ्वीच्या बेंबीत पोहोचते

काय पिता
ढग, पाणी की बर्फ

ही भांडी थेट झाडापासून बनलेत
अधूनमधून जी भाजी आणि फळंही देतात

गॅस
थेट अरबी समुद्रातून
आणि ऑईल
थेट सौदी अरेबियातून

अधूनमधून पाईपलाईनला
अमेरिकेचा गंज चढतो
पण तो वॉशेबल आहे निरम्याला

भूक लागली की येतात हवेतून
खास एयरप्रूफ गोळ्या
आणि संडास
आमच्या पोटात ऑटोमॅटिक जिरतो

ह्या गोळ्या घ्या

येत राहा असेच
प्रत्यक्ष
निदान वर्षातून एकदा

■

एक इमारत

Celebrate your suicide in your art
It will keep you alive

एक इमारत
एका विजेला लटकलेली

एक टॉवर
एका गरुडाच्या पंजात अडकलेला

एक किल्ला
एका विमानाच्या तिकिटात सापडलेला

एक नेट
एका हवाई मॅग्नेटला गच्च चिपकलेले

माझ्याबरोबर ह्या हवेत काय काय उडतंय -
आत्महत्येसाठी

आणि माझी कला तिचे पॅराशूट उघडून
कोसळण्याचा उत्सव करतीये साजरा

हवेतल्या हवेत

थेट जमिनीच्या जिवंत दिशेनं
जिथे मी मरणारय

■

रंगमंच

एक डोळा
अवघा रंगमंच व्यापून
माझ्यासमोर बसलाय

त्याच्या बुबुळात आख्खं ऑडिटोरियम उभं
त्यात माझी प्रतीबिंबित खुर्ची
त्या खुर्चीत मी

एक पापणी
केस सोडतीये भूमिकांचे
आणि केस फेस नसतानाही
केवळ हालचालीतून
आख्खी देहबोली बोलतायत

प्रकाश कुठून येतोय
कुठे जातोय
काही कळत नाहीये
मात्र केसही स्पष्ट दाखवण्याची अद्‌भुत किमया
त्याला साधलीये

विंगा दिसत नाहीत
आणि केसांनाही नाही एक्झिटची घाई

फक्त माझे अंत:स्थ हात
आपण एका डोळ्यांशी जखडले गेलोय
ह्या कल्पनेनचं अस्वस्थ आहेत

त्यांना बहुधा
माझा गळा केसाने कापला जाईल
अशी भिती आहे

▪

बदला

हा कारखान्यांचा एकसूरीपणा घालवायला
ठेवा यंत्राजवळ डोंगर कापून त्यांचे काही गाणारे तुकडे

ह्या शेतजमिनीत उभ्या राहू देत
अप्सरांच्या नागड्या पोझेस पुतळ्यात भिजणाऱ्या

ह्या रस्त्यावरच्या झाडांना चिटकवा काही ट्युबज्
ज्या सोडत राहतील रंगीत प्रकाश पानातून हिरवळणारे

ह्या मोनोटोनस नद्यात सोडा काही असे जलचर
जे पाण्याचे चराचर
हलवत राहतील विविध तोंडात डगमगणारे

ह्या समुद्रावर मांडा काही मल्टीकलर कारंजे
जी त्याच्या निळ्याला व्हरायटी पुरवतील रंगढंगणारी

आणि शेवटी रिप्लेस करा तुमचे स्थिरस्थावर दगलबाज डोळे
नव्या बदलबाज डोळ्यांनी
जे जंगम मालमत्ता टाळून कमावतील
कंडम कालसत्ता
सतत भंजणारी

▪

वार्डरोब

कपाटाशी कपड्याचा पाट लावा
एकमेकात टांगा त्यांच्या टांगा
त्यांचे हँगर हँग करा त्यांच्या मानात

त्यांना लोंबकळत ठेवा
किंवा घाला

शरीर सुरू झालं की त्यांचेही प्रश्न संपतात

▪

घर - १

हे घर कधी बांधलं जाईल
न जाईल
पण मला उतरवू द्या त्याचा टॉप फ्लोअरवरचा ब्रिज
थेट गार्डनमधील एखाद्या रोज व्हॅलीत

मला पोहोचवू द्या माझ्या नटराज पेन्सिलीतून
लाकडाचं थेट तांडव भिंतीभिंतीत

खिडक्या ज्या योग्य वाऱ्यानुसार ऑटोमॅटिक उघडझाप करतात
त्यांना हवाळू द्या माझ्या काळ्या रेषात

जे घर झालेलेच नाही
त्याला करू नका बंद

तुमच्या अस्तित्वात असलेल्या ठोस लोखंडी दरवाजाने

▪

घर - २

ह्या घरात नाहीत चौकोनी खोल्या पेशीसारख्या
हे जिने
हातासारखे खाली येत नाहीत
इथे अवयवांचे बॉक्सेस नाहीत भिंती तयार करणारे
आणि ना सेपरेट टॉयलेटी ढुंगण

हे आहे एका पोकळ माणसाचे जिवंत शैशव
जे थेट अनंतात पोहोचते
माझ्यापासून सुरू होऊन.

▪

घर - ३

एकासारख्या एक
सारख्याच खिडक्या कशाला
एकासारखे एक
सारखेच दरवाजे कशाला
एकासारख्या एक
सारख्याच टाईल्स कशाला

कशाला ह्या माणसांच्या सेम टू सेम स्टाईल्स

माझ्या प्रत्येक घराचा ठसा
इंचाइंचात वेगळा आहे

तो! वाचायला तुम्हाला इंच इंच लढवावा लागेल
तेव्हा....

अन्यथा
जाण्यासाठी मी एक रस्ता मोकळाच सोडलाय
आरसा टाकून तयार केलेला

▪

घर -४

श्वास घ्यायला जागा आहे
मग व्हेण्टिलेशनविषयी काय विचारता

हगायला कमोड आहे
मग प्रायव्हसीचं कोडं कशाला घालत बसलाय

बंद व्हायला दरवाजे आहेत
आधार द्यायला भिंती
आणखी सुरक्षा ती काय हवी

दरवाजा उघडताना मात्र
की-होलमधूनच पहिल्यांदा बघा

काय आहे
मारणारे पाहण्याचा सेकंड चान्स देत नाहीत

मग कधी येताय
लॉक घेऊन?

▪

घर - ५

त्वचेप्रमाणं पोत बदलणाऱ्या ह्या भिंती
आकाशाप्रमाणं पालटणारं हे छत

हवेप्रमाणं उघडमीट करणाऱ्या खिडक्या
वाऱ्याप्रमाणं कमीजास्त स्पिडणारा पंखा

आता एक बायकोच आणा राव
एकदम मरलीन मन्रोसारखी मूडी

म्हणजे तुमचं गुडीगुडी जगणं
एकदम फुलपाखरू होऊन जाईल ह्या घरात

फक्त तो प्लॅस्टिकचा आणलेला फ्लॉवरपॉट
छातीतून फेकून द्या म्हणजे झालं

▪

घर - ६

इथे तर पडदेच पडदे आहेत
टेन्शन देणारे
आणि फाऊंडेशन तर दिसतच नाही ह्या घराचे
आणि पार्किंग झोन असा शिंपल्यात काय ठेवलाय

ह्या भिंती आहेत का फ्रेम्स
आणि वॉलमध्ये इतके ड्रॉवर्स?

माळा तर हँगिंगच ठेवलाय तुम्ही
सामानानं काय फाशीबिशी जायाचं की काय

आणि ही खिडकी
एवढी कशाला मोठी
तिच्यातून आकाशगंगा आत येणाराय की काय

तुम्ही ह्याच ग्रहावरचे आहात ना?

▪

मल्टीपर्पज चेअर

ही चार पायांची चेअर
मल्टीपर्पज आहे

हिच्यावर बसून चेअरमन होता येतं
घरात ऑडर्स देत
किंवा चिंतन करता येतं, चिंता करता येते
अवघ्या विश्वाची

हिच्यात बसून वाचता येतं एखादं पुस्तकं
किंवा ऐकता येते कॅसेट जुनी आणि नवी

ही स्टॅबिलिटी देते ढुंगणाला
किंवा हवा असेल तर स्पॉन्डॅलिटीस

हिला आहे तुमच्याप्रमाणेच पाठ
जिला टेकता येते मज्जासंस्था बाकाळू किंवा ताठ
किंवा हिच्या बुडात शिरून आयुष्याला येणारे बुडबुडे
विसर्जित करता येतात बिनबुडाच्या सूडात आसूडात

ही मुव्हेबल आहे मानेप्रमाणे
त्यामुळे ताठ ठेवण्याचा प्रश्न येत नाही
आणि इच्छा झालीच तर ३६० डिग्रीत फिरून
संपूर्ण जग पाहिल्याचं
किंवा स्वत:भोवती गिरकी मारल्याचं समाधान मिळतं हिचे हात घट्ट पकडून

ही पोट वाढवण्यात वाकबगार
आणि हिच्यात बसून आरामात खाता येतं गरम आणि गार

ही इतकी अद्‌भुत की हिच्यावर उभं राहता येतं
आणि सक्षम असाल तर बायकोला बसल्या बसल्या घेता येतं
किंवा नवऱ्याला देता येतं

ती तुमच्याप्रमाणेच आहे
फक्त तुम्ही दोन पायांचे

आणि ती चार पायांची आहे
एवढचं

बाकी
ती उभी आहे
की बसलेली आहे
हे मात्र रहस्य आहे
आणि तिला स्वत:हून चालता येत नसल्याने
ते कळणं अंमळ कठीणच

▪

घर - ७

आम्ही कम्युनिस्ट नाही
पण सामूहिक जाणिवेचं एक घर बांधून पाहायची उबळ
येतेच की मनाला

ज्यांना शेती करता येत नाही
त्यांनी इतकं तर कबूल करावंच
की त्यांचे पोट कुठल्यातरी शेतकऱ्याच्या हातापासून
हाताच्या अंतरावर आहे
टेलिफोन आले ब्लॅक ॲण्ड व्हाईट टीव्ही आले
म्हणून भूक लागत नाही
असं थोडंच आहे?

म्हणून तर ह्या घराची सुरुवात
कोठार ठार ठासून केलीये

एकदा पोटाची मॅनेजमेंट झाली की
पीटर ड्रकरचा ढेकरही नीट पचण्याजोगा होतो

हा एकवीस मजली जिना
मुद्दामच उजव्या सोंडेच्या गणपतीसारखा रचलाय
बाबूराव अर्नाळकरांच्या काळ्या पहाडापासून
मर्ढेकरांच्या मी एक मुंगी तू एक मुंगीपर्यंत
सगळं ओळीनं रचलंय ह्या सरपटणाऱ्या प्राण्यात
नाही तक्षक नाही हा
तो महाभारतातून उठून टेररिस्टांना आणि नक्षलवाद्यांना
मार्गदर्शन करायला निघून गेलाय
शेवटी ह्या पंथाचा तो आद्यकर्ता ना?

असे खूप लोक जातात उठून
अधूनमधून ह्या जिन्यातून

ह्याच्या टॉप फ्लोअरला एक लाईट हाऊस आहे
काय आहे
भर समुद्रात बांधलंय ना हे घर

जहाजांना सवय नसते घरांची
त्यांना मार्गदर्शन करायला
की बाबांनो हे घर आहे घर
शार्क माशाचे तोंड नाही

ही छतं
फार गरम झालं की आख्खी छतंच फिरवतो
आम्ही फॅनसारखी
ती वर टांगलेली पोती म्हणता
त्या पोथ्या आहेत आम्हाला वाचता न आलेल्या
किंवा प्रेतं नामशेष झालेल्या विविध जातीजमातींची
प्राण्यांच्या माणसांच्या झाडांच्या
जिवंत ठेवता नाही आलं
तर निदान जतन तरी
आता कलावंतांनी ही कामं करायची नाही तर कुणी करायची

आणि हा हॉल
हॉल ऑफ घोस्ट
जोपर्यंत भूत आहे अद्‌भुत आहे
तोपर्यंत भूतं आहेत
म्हणूनच ठेवलाय
तुम्हाला माहितीच असेल
असतील शितं तर जमतील भुतं

आणि आम्ही तर ह्या घराची सुरुवात
साक्षात धान्याच्या कोठारापासून केलेली

आणि हे काळ्या पाण्याची शिक्षा सोसणारे सरोवर
भयकमळे भयब्रह्म भयचर
हे पाण्याचं अंडरवर्ल्ड
भले भले बुडतात इथे
दुर्योधनापासूनचीच परंपरा आहे ती
पण शेवटीही जीव वाचवण्यासाठी सगळे
ह्या सरोवरातच लपून बसतात बरं का
काय आहे काळा पैसा इथून ट्रान्सफर करणं

योग्य त्या टेबलावर
फार सोपं जातं
तो युधिष्ठीर काय खुळा होता होय?
त्यानंच तर हा परफेक्ट गळ लावला होता दुर्योधनासाठी
आणि वर द्रौपदीला सगळे दात काढून
हसायला सांगितलं होतं
सगळे युधिष्ठीर असं काही मयसभेत बांधतातच हो

आणि ह्या भिंती
तुम्ही दरवाजा म्हणून शिराल
आणि पेंटिंगला अडखळून पडाल

ते जे टॉयलेट दिसतंच ना फ्रेममध्ये
ते खरं टॉयलेट
मुतायला हगायला तिथंच जा

ती जी माणसं आहेत
त्या खास बोलक्या बाहुल्या आहेत
रामदास पाध्यांकडून तयार करून घेतलेल्या

आणि ते पुतळे उभे
भुसा आणि मसाले भरून उभी केलेली खास प्रेते आहेत

ह्या इथे
पडद्यांचा पाऊस पडतो
आणि अचानक खिडकीतून दिसतो
खास बल्बाचा सूर्योदय
त्याच्या प्रकाशात उभाय एक मलखांब
कपडे एकमेकात वेटाळून वेटाळून
फिक्स केलेला
प्रॅक्टीस असेल तर चढा
मारा इकडे तिकडे हनुमान उड्या
पडलात तर कोण हसणाराय
इथे हसणाऱ्याचे दात पडतात आपोआप
ह्या प्रकाशयोजनेतच तशी सोय केलीये डेण्टिस्टांनी

आणि हा चक्रव्यूह
जागोजागी विखरून पडलेल्या शीतयुद्धासारखा
सर्वत्र दबा धरून
हा लोखंडी दोर पकडून हळूहळू सरका
घाबरू नका
हा काही द्रोणाचार्यांनी लावलेला चक्रव्यूह नाही
ही फक्त तुम्हाला दचकवण्याची ट्रीक आहे

रायफलपासून अणुबॉम्बपर्यंत सगळं कसं ओळीनं मांडलंय
आणि सोबत एक प्रेत प्रत्येक आयटममागं
अणुबॉम्बसोबतचं तर खास हिरोशिमातून मागवलेलं
बाणासाठी मात्र आम्ही एकलव्यच निवडला
आणि ते मेल्टींग शिसे कशाला म्हणताय
अहो ते प्रेत पाहा
वेद ऐकले म्हणून त्याच्या कानात शिसे सोडून त्याला मारलं होतं
ह्या अद्‌भुत शस्त्राने
हे म्युझियम नाही मॅम
घर आहे घर
म्हणून तर सर्वत्र हे असे उलटेसुलटे आरसे

तो आरसा बघा डेथीमिरर म्हणतो आम्ही त्याला
तुम्ही मेला की तुमचे प्रेत कसं चालेल ते रिफ्लेक्ट करतो तो

आणि आता ही डार्करुम
न बनलेले कित्येक सिनेमे
प्रदर्शित न झालेल्या कित्येक डॉक्युमेंटरीज
छापले न गेलेले कित्येक फोटो
आणि प्रकाशित न झालेले सगळे ऑब्जेक्टस्

सगळंच विखरून पडलंय स्वत:तच
कित्येक तर अनौरस

''ह्या गहन अंधारात हे आरसे काय करतायत?
ही पिसं कुठल्या पक्ष्यांची आहेत? आणि ती कुणाला लागली होती?
इथे प्रकाश छतापासून निघतात
पण जमिनीपर्यंत पोहोचत कसे नाहीत?''

प्रश्न विचारू नका मॅम

ही डार्करुम आहे
आणि तिचा समावेश आमच्या घराच्या कॅटलॉगमध्ये नाही
काय करणार
तिनंच प्रिंट व्हायला नकार दिलाय
लाख कोशिशों के बावजूद

▪

युनिव्हर्सल ट्रॅव्हलरचे स्वगत

एका प्लॅनेटवरून मारेन दुसऱ्या प्लॅनेटवर उडी
तेव्हा जिन्यांना आपोआप गायब होण्याची असेल सवय

वय नसलेल्या काळातून
सय नसलेल्या अवकाशात पोहोचेन तेव्हा
नॉनस्पेशीअल पायांनी माझ्या
पत्करलेलं असेल पासपोर्ट नसलेलं फेलकार्ड दिलफेक आयडेंटिटीचं

सूर्याचे दरवाजे असतील
अभूतपूर्व
अभविष्यपूर्व
आणि तो म्हणेल ती दिशा
पूर्व करायची की नाही
हे ठरवेल नक्षत्रांचा चुरा दाबणारा माझा हात

यानांवर यानं
स्कायलॅबवर स्कायलॅब रचत
मी टाकेन माझ्या आकाशगंगेपासून
ताज्या आकाशगंगेपर्यंत
नित्यनूतन होणाऱ्या मटेरियलचा डायलेक्टीक स्लॅब

एक एक काँक्रीट ठिसूळ करेन ठोसा मारून ठसे मारून
आणि तरीही एखाद्या तबकडीची ठसठस
दर्या में खसखस पिकवत

ठुसठुसली माझ्या दूरवरच्या ठाशीव रक्तवाहिनीत
तर हाताच्या मधल्या बोटातील अंगठीतून
एखादा नीलम लेसर सोडून
शुद्ध करून घेईन निलेतला हिरवा रक्तपुरवठा

हा स्टॉक सटॅक शब्दांचा
ब्रह्मांड पिंजत बह्म काढेल एखाद्या प्रकाशाच्या खिडकीतून
तर आईन्स्टाईनी व्हायोलिनमधली व्हिटगेस्टाईनी तार वाजवत
तुकोबाच्या गळ्यातला अभंग रेकॉर्ड करेन
मी माझ्या गळ्यातील स्टीरिओत
स्टीरिओटाईप न होता
जो तुकारामाबरोबरच झाला होता १७ व्या शतकात गायब

रोडरोमिओ सडकछाप रास्ते का पत्थर असलेला एखादा माझा केस
ह्या ड्रीमआर्किटेक्चरला देत नसेल ताकद
तर त्याला स्वप्नांच्या ठेवून मधोमध
करीन कापून त्याचा वध
सत्याचा मध लावून

ह्या जगड्व्याळ ब्रिजवरून चालताना
कधीतरी मीही पडेन कृष्णविवराच्या एखाद्या सफेदपोश धक्क्याने मुत्यूच्या विवरात

पण पडेन तेव्हा जर तो शेवटचाच पडेल शॉट असेल माझ्या आयुष्यातला
तर कसलाही आवाज न करता
कुठल्याही पेशीला किंकाळी फोडू न देता
कुठलीही वाच्यता न करणाऱ्या
एखाद्या सायलेंट झोनमध्येच मी पडेन

यकीनन

▪

आमच्याविषयी

आम्ही कुठल्याच घराचा
F.S.I.
मोजत नाही
आम्हाला ते
Faltoo Stupid Investigation
वाटतं

आमच्या जागा दिलदार आहेत
आणि जगह जगह पे लिखा है रहने वाले का नाम
आम्ही सर्वांना भाडेकरू समजतो
आणि कुणाशीच करत नाही आम्ही मालकी हक्काचा करार

आम्ही घरे बांधतो
घरघर न लावता
काळजाला घरे न पडता

आम्ही कुणाच्या डोक्यावरचं कवटीवरचं काळजावरचं
छत काढून घेत नाही
ना कुणाच्या पायाखालची जमीन

आम्ही भिंती उभ्या करत नाही
आम्ही भिंती बसवतो

आमच्या घरांना उंबरा नाही
त्यामुळे आमच्या घरातील बायकांना भांडावे लागत नाही

आमच्या घराच्या खिडक्या इंग्रजी आहेत हिंदी आहेत फ्रेंच आहेत जपानी आहेत
आणि मौनीही

मात्र दरवाजा मराठीतच उघडतो
किंवा भाषांनी मुक्त मैत्रीत
किंवा शांततेत अध्यात्माच्या

आमच्या घरांची कौलं रोजाना उडून जातात

पण आमच्या छताला कधी टक्कल पडत नसल्याने
रोज केसासारखी उगवतात
नवी नवी कौलं

आमची जमीन माणुसकीला सरावलेली आहे
आणि ऐन अंधारातही तिच्या हालचाली
माणसांवरच रोखलेल्या असतात स्वत:ला राखताना आणि सावरताना

आम्ही घरांच्या किंमती लावलेल्या नाहीत

काळीज वाजवा
आणि घेऊन जा
तुम्हाला हवा असलेला ह्यापैकी
कुठलाही कौलारू काजवा

■

संभोगानंतर

जिच्यावर आपण झोपलो
ती चादर भुतासारखी
मोल्ड होऊन हवेत उभी

तिची उलटी पावलं
पडतायत
अनवाणी गादीवर
आणि गादी उद्धार झाल्यासारखी
उठून चालायला लागलीये

पडदे
जणू चादरीचे भाऊ असल्यासारखे
एकमेकाला खेटून तिळे उभे असल्याचा फील देत

आपले उतरवलेले कपडेच
फक्त चादरीला दाद देत नाहीयेत

मात्र कोणत्याही क्षणी ते तांडवनृत्य सुरू करतील
स्वत:हून
आणि ह्या नागड्या शरीरांचा बचाव करणं कठीण होईल

बघ
त्यांचाही मूड झपाटून जाण्याचा आहे

उचल
आणि चढव

एकदा त्यांच्या बटणांना हात घातला
की ते बंद होऊन
नॉर्मल होतील
आपल्या शरीराच्या धाकात

▪